पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

रौप्य महोत्सव विशेष

अकोला

● वर्ष १६ ● अंक ८१ ● रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

# RRC ने यशोशिखर गाठावे: केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव




प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**अकोला** : आर.आर.सी. चॅनेलच्या २५ वर्षांच्या यशस्वी वाटचालीत भगवान राजराजेश्वराचा आशीर्वाद आणि सर्वांचे अहोरात्र परिश्रम आहेत. सकारात्मक दृष्टीकोन ठेवल्यामुळेच आज अमरावती विभागात चॅनेलचे कार्य अत्यंत कौतुकास्पद ठरले आहे. यापुढील काळातही आरआरसीने यापेक्षा अधिक उंची गाठत नवीन यशाची शिखरे पादाक्रांत करावीत, अशी अपेक्षा केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांनी व्यक्त केली. शनिवारी रात्री बाळापूर मार्गावरील हॉटेल हेरिटेज येथे आर.आर.सी.च्या दिमाखदार रौप्य महोत्सवी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या शानदार सोहळ्यात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करत होते. व्यासपीठावर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर,



महाराष्ट्र भाजपचे विधीमंडळ पक्ष प्रतोद व आमदार रणधीर सावरकर,भाजप सह-मुख्यप्रवक्ता अजित चव्हाण, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार नितीन देशमुख, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, अमरावतीचे खासदार डॉ. अनिल बोंडे, खासदार बळवंत वानखडे, माजी आमदार श्रीकांत देशपांडे, आर.आर.सी.चे संचालक प्रदीप देशमुख, राष्ट्रवादीचे महानगर अध्यक्ष विजयभाऊ देशमुख, कार्यकारी संचालक पंकज देशमुख, नरेंद्र देशमुख, सतीश देशमुख आणि संजय देशमुख आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते राजराजेश्वर प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर नेहा कापसे हिने सुरेल गणेश वंदना सादर केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी केले. 'एका छोट्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले असून, आर.आर.सी. टीम आणि प्रेक्षकांच्या सहकार्यामुळेच हा टप्पा गाठता आला,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.
















## विविध क्षेत्रातील मान्यवरांची कार्यक्रमाला विशेष उपस्थिती

या भव्य सोहळ्यास श्रीमती इंदुमती देशमुख, सौ. कल्पनाताई देशमुख, सौ. ऋतुजा देशमुख, नयनाताई देशमुख, श्रेया, माजी उपमहापौर रफिक सिद्दीकी, महादेवराव भुईभार, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. जयराज कोरपे, प्रदीप खाडे, हितेश अग्रवाल, सराफा असोसिएशनचे अध्यक्ष शैलेश खरोटे, प्रतिक मंत्री, रोहित बलोदे, बबनराव कानकिरड, उद्योगपती रामप्रकाश मिश्रा, सोनू देशमुख, आतिश देशमुख (वाशीम), संदीप मानकर (अमरावती), सतीश देशमुख, सुधीर देशमुख (नागपूर), प्रा. मधू जाधव, कवी किशोर बळी, डॉ. किशोर बिडवे, डॉ. नितीन कोष्टी, दिलीप खत्री, बाळ काळणे, माजी महापौर सुरेश पाटील, मधुकर ढाकुलकर, ॲड. वल्लभ नारे, युसुफ चौधरी, मनीष हिवराळे, गोपाल दातकर, विजय केडिया, प्रा.







सुभाष गादिया, श्याम सारभुकन, धनंजय साबळे, उमेश अलोणे, नगरसेवक आशीष पवित्रकार, योगेश पवित्रकार, डॉ. अमोल रावणकर, माजी उपमहापौर निखिलेश दिवेकर, प्रा. प्रकाश डवले, प्रिती कमाविसदार, हेमंत देशमुख, जया भारती, सौ. मृणालिनी डवले, राजेश मिश्रा, फैय्याज खान, योगेश अग्रवाल, अजय रामटेके, पूजा काळे, महेंद्र गवई आणि प्रदीप गुरुखुद्दे यांच्यासह विविध क्षेत्रांमधील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इव्हेंट ऑर्गनायझर स्वप्नील रोम,श्रद्धा वरणकार यांच्यासह अजिंक्य देशमुख यांनी केले.

## मान्यवरांचा सत्कार सोहळा

» समारंभाच्या सुरुवातीला केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचा विजयभाऊ देशमुख व पंकज देशमुख यांनी शाल व सन्मानपत्र देऊन सत्कार केला. तसेच पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांचा सत्कार प्रदीप देशमुख व संजय देशमुख यांनी केला. याशिवाय खासदार डॉ. अनिल बोंडे यांचा सतीश देशमुख यांच्या हस्ते, खासदार बळवंत वानखडे यांचा संजय देशमुख यांच्या हस्ते, आमदार रणधीर सावरकर यांचा अजित चव्हाण यांच्या हस्ते, आमदार वसंत खंडेलवाल यांचा नरेंद्र देशमुख व आदित्य देशमुख यांच्या हस्ते, आमदार नितीन देशमुख यांचा चिन्मय देशमुख व जगदीश देशमुख यांच्या हस्ते, तर कुलगुरू डॉ. शरद गडाख यांचा परीक्षित देशमुख व सुधीर देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## मान्यवरांचे मनोगत व शुभेच्छा

» पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर म्हणाले की, 'बंडूभाऊंनी राजेश्वराच्या कृपेने केबल व्यवसायाची सुरुवात केली. परिवर्तनाच्या कठीण काळातही आरआरसीने आपले सातत्य कायम राखले, जे खरोखर वाखाणण्याजोगे आहे. पुढील वाटचालीसाठी मी बंडूभाऊ, विजयभाऊ आणि पंकज देशमुख यांना मनापासून शुभेच्छा देतो.'

» खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी सांगितले की, 'आर.आर.सी.ने या परिसरातील सर्वसामान्यांचे दुःख आणि प्रश्न प्रभावीपणे मांडले असून त्यातून लोकांचा भक्कम विश्वास संपादन केला आहे.'

» खासदार बळवंत वानखडे यांनी, 'आर.आर.सी.ने या भागात उत्कृष्ट कार्य केले असून विश्वासार्हता जपत २५ वर्षांचा सुवर्णकाळ पूर्ण केला आहे,' असे नमूद करत पंकज देशमुख व त्यांच्या संपूर्ण टीमला शुभेच्छा दिल्या.

» आमदार नितीन देशमुख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, 'बंडूभाऊ देशमुख यांनी आरआरसीच्या माध्यमातून या भागात उत्तम पाया रचला. वस्तुस्थिती जनतेसमोर आणणे हे प्रसारमाध्यमांचे कर्तव्य असते. सत्तेच्या विरोधात धाडसाने सत्य दाखवावे लागते. आजच्या काळात लोकशाहीचा चौथा स्तंभ जिवंत राहील की नाही, अशी स्थिती असताना आरआरसीने कसलेही लेबल न लावता नेहमीच खरी वस्तुस्थिती मांडली आहे.'

## लोकमान्यता, कोट्यवधींच्या विकासकामांच्या बळावर

# पन्नास हजारांच्या मताधिक्यांचा लीड : आ. रणधीर सावरकर

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**अकोला** : भाजपचे आमदार रणधीर सावरकर यांनी अकोला पूर्व मतदारसंघात आपल्या विकासाच्या राजकारणातून जनसामान्यांचा अफाट विश्वास संपादन केला आहे. सन २०१४ मध्ये पहिल्यांदा निवडून आल्यापासून त्यांच्या विजयाचा आलेख सातत्याने उंचावत गेला आहे. सतत वाढत गेलेला लोकसंग्रह, जनतेचा वृध्दींगत झालेला विश्वास आणि कोट्यवधी रुपयांचा निधी मतदारसंघात खेचून आणत केलेली सर्वसमावेशक विकासकामे आणि जनतेला तत्काळ उपाय (सोल्युशन) देण्याच्या भूमिकेमुळेच निवडणुकीतील मताधिक्य थेट पन्नास हजारांवर पोहोचले, असे प्रतिपादन आमदार रणधीर सावरकर यांनी केले. आर.आर.सी. न्यूजच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमात एका विशेष 'इंटरॲक्टिव्ह सेशन'मध्ये विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना ते बोलत होते.



### लोकशाहीतील चौथ्या स्तंभाची भूमिका आणि सातत्य

» भारतीय संविधानाने नागरिकांना व प्रसारमाध्यमांना 'फ्रीडम ऑफ एक्स्प्रेशन' (अभिव्यक्ती स्वातंत्र्य) दिले असून, लोकशाहीत चौथ्या स्तंभाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. आर.आर.सी. न्यूजने अकोला भागात लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे आणि आजही ती यशस्वीपणे पार पाडत आहे, असे गौरवोद्गार आ. सावरकर यांनी काढले. माध्यमांकडून अनेकदा लोकप्रतिनिधींवर टिकेच्या माध्यमातून भडीमार केला जातो; परंतु अशा गोष्टी नकारात्मक न घेता त्यातून सकारात्मक बोध घेऊन त्यानुसार काम सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. बातम्यांमधील 'बिटवीन द लाईन्स' (त्या ओळींमधील गर्भित अर्थ ) समजून घेणे महत्त्वाचे असते, असे ते म्हणाले.

### बारा वर्षांपूर्वीची ती हेडलाईन आणि आजचा प्रवास

» आपल्या जुन्या आठवणींना उजाळा देताना आमदार सावरकर म्हणाले की, बरोबर बारा वर्षांपूर्वी विधानसभा निवडणुकीच्या काळात आर.आर.सी.ने २४०० मतांच्या लीडची माझी पहिली बातमी प्रकाशित केली होती. त्यानंतरच्या काळात जनतेने दिलेले प्रेम आणि विश्वासाची वीण अधिक घट्ट होत गेली. सन २०१९ मध्ये विजयाचा हा लीड चोवीस हजारांच्या वर गेला आणि २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत तो थेट ५० हजारपेक्षा अधिक मतांच्या लीडवर जाऊन पोहचला. हा वाढता आलेख म्हणजे मतदारांनी विकासावर दाखवलेला ठाम विश्वास आहे, कारण भारतीय जनता पार्टी ही नेहमीच विकासाशी बांधील राहिली आहे.

# राणीगाव सर्कल मधील शेतकऱ्यांचे चक्रवादळामुळे मोठे नुकसान

## आमदार केवलराम काळे व कृषी विभागाने घटनेची पाहणी करून नुकसान भरपाई देण्याचे निर्देश दिले

जयकिसन इंगळे २७ सप्टेंबर

**धारणी:** धारणी तालुक्यातील शुक्रवारी संध्याकाळी सुसर्दा आणि नागझिरा व दाबका, नारडु, बारातांडा,सह आसपासच्या ग्रामीण भागात झालेल्या सोसाट्याच्या वाऱ्यांमुळे, वादळामुळे आणि पावसामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली आहे. अचानक आलेल्या चक्रीवादळासारख्या हवामानामुळे शेतातील उभ्या खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे वृत्त समोर येत आहे. परिसरातील विविध गावांमधून पिकांचे नुकसान आणि उन्मळून पडलेल्या झाडांचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर दिसू लागले आहेत. वृत्तानुसार,



संध्याकाळी हवामानात अचानक झालेल्या या बदलामुळे हे घडले. सोसाट्याच्या वाऱ्यासह वादळ सुरू झाले. त्यानंतर लगेचच मुसळधार पाऊसही सुरू झाला. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तर काही ठिकाणी विजेचे खांबही पडल्याचे वृत्त आहे. यामुळे ग्रामीण भागातील वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या मते, वादळाचा सर्वाधिक परिणाम शेतात उभ्या असलेल्या खरीप पिकांवर होईल. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे पिके जमिनीवर पडली असून, काही शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे वृत्त आहे.या अचानक आलेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे, हवामान आणि शेतीसंबंधित आव्हानांशी आधीच झगडणाऱ्या शेतकऱ्यांच्या समस्यांमध्ये आणखी भर पडली आहे. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, रात्रंदिवस मेहनत करून तयार केलेली पिके अचानक आलेल्या जोरदार वादळामुळे खराब झाली आहेत. हे वादळ शेतकऱ्यांसाठी एक आपत्तीच ठरले आहे. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना येत्या काळात आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो. सुसर्दा, नागझिरा, डबका यांसारख्या बाधित गावांमध्ये पंचनामा आणि इतर जमिनीच्या नोंदी तात्काळ तयार कराव्यात, अशी विनंती शेतकऱ्यांनी प्रशासनाला केली आहे.त्यांनी पिकांच्या सर्वेक्षणाची मागणी केली आहे. तसेच, प्रत्यक्ष झालेल्या नुकसानीचे मूल्यांकन करून नियमांनुसार योग्य नुकसान भरपाई आणि पीक नुकसानीची भरपाई देण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

# आष्ठोलीच्या मातीतून जन्माली सरस्वती: शिक्षिका असूनही जपली गणेशभक्तीची कला

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**अमरावती :** सध्याच्या धावपळीच्या आणि रेडिमेडच्या युगात जिथे बाजारातून प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या (PoP) मूर्ती आणण्याकडे लोकांचा कल वाढला आहे, तिथे अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यातील आठोली सारख्या छोट्या गावातील एका उच्चशिक्षित तरुणीने स्वतःच्या शेतातील मातीतून साक्षात गणपती बाप्पाची देखणी मूर्ती साकारून समाजात एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

MSc, BEd शिक्षण; तरीही मातीशी आणि संस्कृतीशी घट्ट नाळ आष्ठोली येथील रहिवासी कु. पूर्वा मनोहरराव अढाऊ यांनी MSc, BEd पर्यंतचे उच्च शिक्षण पूर्ण केले असून, सध्या त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पब्लिक स्कूल, कोळवी येथे शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शिक्षिका म्हणून ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असतानाच, त्यांनी आपल्या संस्कृतीशी



आणि कलेशी असलेली नाळ कायम ठेवली आहे. दरवर्षी त्या स्वतःच्या हाताने पर्यावरणपूरक मातीची गणेशमूर्ती घडवतात. या कार्यात त्यांचा धाकटा भाऊ रुद्रेश अढाऊ हा नेहमी खारीचा वाटा उचलत त्यांना मदत करतो.

**संयुक्त कुटुंबाचा भक्कम पाठिंबा**

आजच्या विभक्त कुटुंब पद्धतीच्या काळात आष्ठोली येथील अढाऊ परिवाराने संयुक्त कुटुंबाची परंपरा जपली आहे. पूर्वा यांच्या या उपक्रमामागे त्यांचे वडील मनोहरराव अढाऊ, आई सविता मनोहरराव अढाऊ, आजोबा रावसाहेब साहेबराव अढाऊ, गजानन साहेबराव अढाऊ, बाबासाहेब साहेबराव अढाऊ यांच्यासह भाऊ सागर, अंकुश, श्रीकेश, रुद्रेश आणि आदर्श या संपूर्ण संयुक्त कुटुंबाचा भक्कम पाठिंबा आहे.

**गावकऱ्यांकडून थाटात गौरव व भावूक क्षण**

पूर्वा यांच्या या अद्वितीय कलेची दखल घेत युवा फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गजानन चौधरी, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अमितभाऊ अढाऊ व गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी थेट पूर्वा यांच्या घरी जाऊन शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि मानाचे सन्मानचिन्ह देऊन त्यांचा भावूक वातावरणात सत्कार केला.

# जिल्ह्यातील सर्व 14 तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती

## शासनाकडून 'ट्रिगर-1' नुसार उपाययोजना सुरू

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**अमरावती:** खरीप हंगाम 2026 मधील पावसाची तूट आणि इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे जिल्ह्यातील सर्व 14 तालुक्यांमध्ये शासनाने दुष्काळसदृश परिस्थिती घोषित केली आहे. मदत व पुनर्वसन विभागाने 25 सप्टेंबर 2026 रोजी शासन निर्णय जारी करून जिल्ह्यात दुष्काळ संहितेच्या 'ट्रिगर-1' नुसार विविध उपाययोजना केल्या आहेत.

या निर्णयामुळे अमरावती, भातुकली, चांदूर रेल्वे, नांदगाव खंडेश्वर, धामणगाव रेल्वे, अचलपूर, अंजनगाव सुर्जी,



तिवसा, धारणी, चिखलदरा, वरुड, मोर्शी, चांदुर बाजार आणि दर्यापूर या सर्व 14तालुक्यांमधील शेतकऱ्यांना विविध सवलती आणि उपाययोजनांचा लाभ मिळणार आहे. शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना सवलती मिळणार असून काही उपाययोजना करण्यात आल्या आहेत. यात जमीन महसूलात सूट व पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, 7.5 हॉर्सपावरपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सूट, टंचाईग्रस्त काळात शेतकऱ्यांच्या शेती पंपाची वीज जोडणी खंडित न करणे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी, 'मनरेगा' (रोहयो) अंतर्गत कामांच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे उपलब्ध करणे, तसेच आवश्यक तेथे पिण्याच्या पाण्याचे टँकर्स आणि जनावरांसाठी चारा-पाण्याची व्यवस्था आदी उपाययोजना करण्यात येणार आहे. विहित कार्यपद्धती पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना पिकांच्या नुकसानीपोटी आर्थिक मदतीसंदर्भात स्वतंत्र शासन निर्णय जारी केला जाणार आहे.

# अमरावती जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर होताच खासदार अनिल बोंडे थेट शेती बांधावर...

## कर्जासाठी बँकेने शेतकऱ्यांची अडवणूक करू नये -अनिल बोंडे

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**अमरावती:** राज्य सरकारने अमरावती जिल्ह्यातील सर्व १४ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला.. यानंतर थेट भाजप नेते राज्यसभा खासदार अनिल बोंडे यांनी अमरावतीच्या मोझरी गावातील सोयाबीनच्या नुकसान झालेला शेती बांधावर जाऊन पाहणी केली..

यानंतर अनिल बोंडे यांनी राज्य सरकारचे आभार मानले.. देवा भाऊ खरंच संवेदनशील



आहे,कोणत्या शब्दात त्यांचे आभार मानू यासाठी शब्द नाही ..सोयाबीन तूर कापूस याचे पूर्ण नुकसान झाले .दुष्काळ जाहीर केला त्याच्या उपाययोजना सुरू केल्या त्यासाठी आभार आहे असं त्यांनी सांगितलं.. तर कर्जासाठी कुठल्याही बँकेने अडवणूक शेतकऱ्यांना करू नये...आमच्याकडे शेतकऱ्यांनी कर्जासाठी फोन जरी केला तरी आमचा कार्यकर्ता बँकेमध्ये जाईल आणि शेतकऱ्यांना कर्जासाठी मदत करेल.. शेतकऱ्यांना एकट सोडणार नाही ,बँकेमध्ये संघर्ष करावा लागला तरी चालेल पण शेतकऱ्यांना कर्ज मिळाला पाहिजे यासाठी प्रयत्न राहील अशी प्रतिक्रिया खासदार अनिल बोंडे यांनी दिली.

# रताळी येथे तरुण शेतकऱ्याची आत्महत्या

## कराराने केलेल्या शेतीत नुकसान; कर्जामुळे कुटुंब आर्थिक अडचणीत

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**साखरखेर्डा :** सिंदखेड राजा तालुक्यातील रताळी येथील आकाश बळीराम पाटील (वय २६) या युवा शेतकऱ्याने आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (२६ सप्टेंबर) सकाळी उघडकीस आली. पिकांचे नुकसान आणि कुटुंबावरील कर्जामुळे तो आर्थिक विवंचनेत होता, असे कुटुंबीयांचे म्हणणे आहे. आत्महत्येमागील नेमके कारण मात्र पोलिस तपासानंतर स्पष्ट होणार आहे.

आकाशच्या कुटुंबाकडे चार एकर शेती आहे.अपुऱ्या उत्पन्नामुळे वडील बळीराम पाटील आणि दोन्ही मुले इतरांची शेती कराराने करीत होते, तर आई लक्ष्मीबाई मोलमजुरी करून कुटुंबाला हातभार लावत होत्या.

बळीराम पाटील यांनी २०१९-२०मध्ये भारतीय स्टेट बँकेकडून कृषिकर्ज घेतले होते. उत्पन्नातील घट आणि वाढत्या व्याजामुळे कर्जाची परतफेड होऊ शकली नसल्याचे कुटुंबीयांनी सांगितले. शासनाच्या कर्जमाफीच्या यादीत त्यांचे नाव आले नसल्याचाही कुटुंबाचा दावा आहे.

आकाशने यंदा गावातील एका शेतकऱ्याची दहा एकर शेती कराराने घेत सोयाबीन आणि तुरीची लागवड केली होती. त्यासाठी सुमारे अडीच लाख रुपये खर्च झाल्याचे नातेवाईकांनी सांगितले. जुलैतील पावसामुळे पिके सुरुवातीला चांगली होती; मात्र ऑगस्ट आणि सप्टेंबरमधील प्रदीर्घ खंडामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता निर्माण झाली होती. शनिवारी आकाशने आत्महत्या केल्याचे उघड झाले.

# निराधारांवर आता टीसीचा भार; या वयात कुठे वणवण करणार?

## विशेष साहाय्य योजनांच्या लाभासाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य !

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**खामगाव :** विशेष सहाय्य योजनांच्या लाभासाठी शासनाकडून पात्रतेच्या विविध अटी पूर्ण करण्याची प्रक्रिया राबविली जाते. अर्जदाराची वैयक्तिक माहिती, वयाचा पुरावा, उत्पन्नाचा दाखला, आधार क्रमांक आणि बँक खात्याची माहिती यापूर्वीच आवश्यक आहे. आता वयाच्या पुराव्यासाठी जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करण्याची अट लागू करण्यात आल्याने अनेक वयोवृद्ध लाभार्थ्यांसमोर नव्या अडचणी उभ्या राहिल्या आहेत. विशेषतः निराधार, श्रावणबाळ आणि विधवा, परित्यक्ता महिलांना कागदपत्रांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागण्याची शक्यता आहे.

**कार्यालयांच्या फेऱ्या वाढणार!**

जन्म प्रमाणपत्र किंवा शाळा सोडल्याचा दाखला उपलब्ध नसल्यास संबंधित नोंदी शोधणे, प्रमाणपत्र मिळविणे आणि त्यानंतर योजनेच्या अर्जासोबत ते सादर करणे अशी प्रक्रिया लाभार्थ्यांना पार पाडावी लागू शकते.

**शासनाच्या विविध विशेष साहाय्य योजना**

राज्य शासनाच्या विशेष साहाय्य योजनांमध्ये संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना यांसह विविध पात्र लाभार्थ्यांना आर्थिक साहाय्य देणाऱ्या योजनांचा समावेश आहे. निराधार व्यक्ती, वृद्ध, विधवा, परित्यक्ता महिला आणि अन्य पात्र लाभार्थ्यांना या योजनांच्या माध्यमातून नियमित आर्थिक मदत दिली जाते. अत्यल्प उत्पन्न असलेल्या आणि स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी आधार नसलेल्या कुटुंबांसाठी ही मदत महत्त्वाची ठरते.

**पात्रतेच्या पुराव्यासाठी ही कागदपत्रे आवश्यक!**

विशेष सहाय्य योजनांसाठी अर्जदाराची वैयक्तिक माहिती, आधार क्रमांक, बँक खाते, उत्पन्नाचा दाखला तसेच वयाचा पुरावा आदी कागदपत्रे आवश्यक असतात. योजनेनुसार अन्य कागदपत्रांचीही मागणी होऊ शकते. पात्रता निश्चित करताना संबंधित कागदपत्रांच्या आधारे अर्जदाराची माहिती तपासली जाते. त्यामुळे कागदपत्रांमधील माहिती अचूक आणि परस्परांशी सुसंगत असणेही महत्त्वाचे ठरते.

**वयोवृद्ध लाभार्थ्यांनी कुठून आणायची टीसी ?**

आजच्या काळात शाळा सोडल्याचा दाखला मिळविणे तुलनेने सोपे असले तरी अनेक ज्येष्ठ लाभार्थ्यांचे शिक्षण अनेक दशकांपूर्वी झालेले आहे. जुन्या शाळेची नोंद उपलब्ध आहे का, शाळा अस्तित्वात आहे का, संबंधित अभिलेख कुठे आहेत, याचा शोध घेण्याची वेळ त्यांच्यावर येऊ शकते. काही लाभार्थ्यांना गावातून तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागू शकते.

# रस्ता, पाणी, नालीच्या प्रश्नावर नागरिक आक्रमक!

## नगरपरिषदेत धडकः मुख्याधिकाऱ्यांशी संवाद

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**मलकापूर :** जवाहरनगर भाग क्र. १ मधील रस्ता, पिण्याच्या पाण्याची जलवाहिनी आणि नालीच्या समस्यांकडे लक्ष वेधत, नागरिकांच्या शिष्टमंडळाने २४ सप्टेंबर रोजी नगरपालिकेत धडक देत मुख्याधिकारी संजय केदार यांच्याशी संवाद साधला. यावेळी नागरिकांनी समस्यांबाबत नाराजी व्यक्त करीत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

निवेदनावर डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. मनोज पाटील, राहुल देशमुख, अनिल बुरड, ॲड. प्रविण भोळे, डॉ. पी. पी. अग्रवाल, डॉ. नरेंद्र सुपे, डॉ. पवन पाटील, वासुदेव कोलते, विजय पाटील, सचिन भंसाली, सावनसिंह शेखावत, अनिल बोंडे, ॲड. संजय वानखेडे आदींसह नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**सभापतींनी घेतला समस्यांचा आढावा !**

नगर परिषदेच्या सभागृहात नागरिकांनी समस्या मांडल्यानंतर शिक्षण सभापती अशांत वानखेडे यांनीही नागरिकांच्या प्रश्नांवर उपाययोजना करण्याची मागणी केली. कायमस्वरूपी कामांना वेळ लागणार असल्यास किमान तात्पुरत्या स्वरूपातील उपाययोजना युद्धपातळीवर कराव्यात, अशी सूचना त्यांनी केली.

**मुख्याधिकाऱ्यांकडून आश्वासन!**

जवाहरनगरातील समस्यांवर शिष्टमंडळाशी संवाद साधताना मुख्याधिकारी संजय केदार यांनी प्रश्नांवर तोडगा काढण्याची ग्वाही दिली. निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने त्यानंतर हे विषय सभागृहासमोर ठेवून आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

# दामिनी पथकाचे जागृतीपर मार्गदर्शन

**मलकापूर :** येथील गोविंद विष्णू महाजन कनिष्ठ महाविद्यालयात दामिनी पथकाने भेट देऊन विद्यार्थिनींना महिला सुरक्षेबाबत मार्गदर्शन केले. यावेळी पोलिस अंमलदार अर्चना मते यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. छेडछाड किंवा कोणत्याही प्रकारचा त्रास होत असल्यास विद्यार्थिनींनी निःसंकोचपणे पोलिसांशी संपर्क साधावा, असे अर्चना मते यांनी सांगितले. तक्रारदार महिलेचे नाव गोपनीय ठेवले जाते, अशी माहिती त्यांनी दिली. शाळा-महाविद्यालयाबाहेरील टवाळखोरांचा त्रास, पोलिस मदत कक्ष तसेच दामिनी पथकाच्या टोल-फ्री क्रमांकाबाबतही विद्यार्थिनींना माहिती देण्यात आली. उपविभागीय पोलिस अधिकारी सोहन माछरे व ठाणेदार गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनात शहरातील विविध शाळा-महाविद्यालयांमध्ये महिला सुरक्षेबाबत जनजागृती केली जात आहे.

# दाताळा नजीक अर्टिगाने मोटारसायकलला दिलेल्या धडकेत पती-पत्नी गंभीर जखमी; चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**मलकापूर :** रुद्र पेट्रोल पंपासमोर मारुती अर्टिगा कारच्या चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून मोटारसायकलला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दांपत्य गंभीर जखमी झाले असून वाहनाचे सुमारे ५ हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

भाडगणी ता.मोताळा येथील रहिवासी विलास नानाराव खोडके यांचे भाऊ व वाहिनी हे २० सप्टेंबर रोजी दुपारी २.३० ते ३ वाजेच्या सुमारास मोटारसायकल क्र.एमएच-२८-एक्यू-४६६७ ने भाडगणीवरून मलकापूरकडे जात होते. रुद्र पेट्रोल पंपासमोरून जात असताना अर्टिगा कार क्र. एमएच-५६-ए-३६९० च्या चालकाने आपले वाहन निष्काळजी व हलगर्जीपणाने चालवून त्यांच्या मोटारसायकलला जबर धडक दिली. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. अपघात घडल्यानंतर कारचालक जखमींना कोणतीही वैद्यकीय मदत न करता वाहनासह घटनास्थळावरून पसार झाला.

या प्रकरणी विलास खोडके यांच्या तोंडी रिपोर्टवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी २४ सप्टेंबर रोजी आरोपी कारचालक दिलीप ज्ञानेश्वर रोकडे रा.मलकापूर याच्याविरुध्द अप क्र. १९०/२०२६, कलम २८१, १२५ (अ), (ब) व ३२४ बीएनएसएस अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. दाखल अधिकारी सफौ बाळू टाकरखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली बीट अंमलदार पोका सुभाष सरकाटे पुढील तपास करत आहेत.

# दुधलगाव येथे उसने घेतलेले 550 रुपये मागितल्यावरून महिलेस मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**मलकापूर:** उसने घेतलेले अवघे ५५० रुपये परत मागितल्याच्या कारणावरून एका महिलेला विटेने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना दुधलगाव बुद्रुक येथे घडली. याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुधलगाव बुद्रुक येथील रहिवासी सौ.विद्या साहेबराव झनके (वय ५८) यांनी आरोपी पांडुरंग आकार झनके रा.दुधलगाव बु. याला ५५० रुपये उसने दिले होते. २४ सप्टेंबर रोजी सकाळी ९.०० वाजेच्या सुमारास विद्या झनके यांनी आपले पैसे मागितले असता आरोपीने मी पैसे देत नाही असे म्हणून त्यांना शिवीगाळ केली. तसेच अंगावर विट भिरकावून मारली, ती विट त्यांच्या उजव्या मनगटाच्या खाली लागल्याने त्या जखमी झाल्या. यानंतर आरोपीने त्यांना ढकलून देऊन चापटबुक्क्यांनी मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. याच वेळी आरोपी रॉयन तेजराव इंगळे रा.मुंबई यानेही फोनवरून फिर्यादीस शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी सौ.विद्या झनके यांच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी २५ सप्टेंबर रोजी आरोपी पांडुरंग झनके व रॉयन इंगळे यांच्याविरुध्द अप क्र. १९३/२०२६, कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२), (३) व ३ (५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास बीट अंमलदार मपोहेकॉ सविता मोरे पुढील तपास करत आहेत.

# धुऱ्याच्या वादातून दोन गटांत हाणामारी; गुन्हा दाखल

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**पारखेड येथील घटना : परस्परविरोधी तक्रार**

**खामगाव:** पारखेड येथे शेतीच्या धुऱ्याच्या जुन्या वादातून दोन गटांत हाणामारी झाल्याची घटना २५ सप्टेंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी खामगाव ग्रामीण पोलिसांनी गुन्हा दाखल केला. आशा बळीराम डोबे (३८) यांच्या तक्रारीनुसार, भानुदास शालीग्राम वांढे यांनी शिवीगाळ केल्यानंतर जाब विचारण्यासाठी गेलेल्या ओम डोबे याच्या डोक्यावर दगड मारून जखमी केले, याप्रकरणी भानुदास वांढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला. तर निळकंठ भानुदास वांढे (२९) यांच्या तक्रारीनुसार, ओम डोबे याने भानुदास यांच्या डोक्यात दगड मारून जखमी केले. याप्रकरणी ओमविरुद्ध गुन्हा दाखल झाला.

# जिल्ह्यात तातडीने पंचनामे सुरु करावेत

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**अमरावती:** शासनाने जिल्ह्यातील सर्व तालुक्यात दुष्काळसदृश्य स्थिती जाहीर केली आहे. त्यामुळे यंत्रणांनी तातडीने उद्यापासूनच शेतीच्या नुकसानीचे पंचनामे सुरू करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिले आहे.

जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी, शासन निर्णयानुसार जिल्ह्यातील सर्व 14 तालुक्यांमध्ये ट्रिगर 1 शासनाने मंजूर केला आहे. ट्रिगर 2 ची कुठलीही वाट न पाहता ट्रिगर 3 म्हणजेच क्षेत्रिय सत्यापन यासाठी पंचनामे करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. सर्व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांनी तालुका कृषी अधिकारी, गटविकास अधिकारी आणि आवश्यक असलेल्या सर्व यंत्रणांचा समन्वय साधून जिल्ह्यातील पंचनाम्याची कारवाई सुरू करण्याचे निर्देश दिले.

त्यासोबतच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी तालुकास्तरावर शेतकरी मदत कक्ष कार्यान्वित करावा. शेतकऱ्यांचे पंचनामे तसेच कर्जमुक्ती योजनेत त्यांना मिळवायचा लाभ व त्यासाठी करायची ई-केवायसी, तसेच शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक नोंदणी करावी लागणार आहे. यासाठी बँका व सहकार सहनिबंधक यांच्याशी आवश्यक समन्वय साधावा. तसेच कर्जमुक्तीचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना बँकांद्वारे नवीन कर्ज दिले जाईल, याची खात्री करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले आहे.

# सुप्रिया सुळेंना आंदोलनाचा अधिकार काय? त्यांनी वडिलांचा काळ आठवावा, खासदार अनिल बोंडेंचा घणाघात

**अमरावती :** भाजप खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. "सुप्रिया सुळेंबद्दल लोकांच्या मनात चीड असून त्यांनी बोलूच नये, त्यांना आंदोलनाचा काय अधिकार आहे?" असा संतप्त सवाल बोंडेंनी उपस्थित केला.

बोंडेंनी शरद पवारांवर थेट निशाणा साधला. "सुप्रिया सुळेंनी त्यांच्या वडिलांचा काळ आठवावा. विदर्भात शेतकरी आत्महत्या होत असताना मनमोहन सिंग आले होते, पण शरद पवार कृषिमंत्री असताना विदर्भाकडे ढुंकूनही पाहत नव्हते...

१०५ गोवारींचे मृतदेह पडलेले असताना हे सर्व सोडून मुंबईला गेले होते. यांच्या काळापेक्षा कितीतरी पटीने अधिक मदत देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना केली आहे, असा टोला बोंडेंनी लगावला.

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला | रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

श्रीमंती विचारांची असायला हवी, पैसा काय भिकारीही कमावतो

## »थोडक्यात

### दुष्काळ जाहीर केला, मग प्रत्यक्ष मदत कधी?

**परभणी :** मराठवाडा दुष्काळी पाहणी दौऱ्याच्या दुसऱ्या दिवशी परभणी जिल्ह्यात दाखल झालेल्या आदित्य ठाकरे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. यानंतर परभणीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली. 'दुष्काळ जाहीर केला, शासनाने जीआर काढून १२ उपाययोजनाही जाहीर केल्या, मात्र प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात मदत कधी येणार? वाढत्या शेतकरी आत्महत्या पाहता, जर शेतकऱ्यांची मदत तातडीने पोहोचली नाही, तर राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा (लॉ अँड ऑर्डर) मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो,' असा इशारा आदित्य ठाकरे यांनी दिला आहे.

### सर्जिकल स्ट्राईकला १० वर्ष!

**दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी आपल्या 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमादरम्यान भारतीय सैन्याने पाकिस्तान आणि त्यांच्या हद्दीतील दहशतवादी ठिकाणांवर केलेल्या ऐतिहासिक 'सर्जिकल स्ट्राईक'च्या आठवणींना उजाळा दिला. सर्जिकल स्ट्राईकला १० वर्षे पूर्ण होण्याच्या अगदी आदल्या दिवशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, भारत आता दहशतवाद अजिबात खपवून घेणार नाही आणि शत्रूने डोळा वर करून पाहिल्यास त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल. कार्यक्रम सुरू करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, 'मी देशवासीयांचे स्वागत करतो. 'मन की बात'मध्ये आपण देशातील सकारात्मक प्रयत्नांना व्यासपीठ देतो आणि उपलब्धींची चर्चा करतो.

### सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी : विखे पाटील

**मुंबई :** राज्यात पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा निर्णय घेत राज्यातील २६५ हून अधिक तालुक्यांमध्ये 'ट्रिगर-१' नुसार दुष्काळ जाहीर केला आहे.

सरकारच्या या तत्पर निर्णयाचे स्वागत करत राज्याचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी महाविकास आघाडीवर सडकून टीका केली आहे. 'महाविकास आघाडीने त्यांच्या अडीच वर्षांच्या काळात जनतेला काहीच दिले नाही, मात्र आमचे सरकार कर्जमाफीपासून ते दुष्काळापर्यंत प्रत्येक संकटात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,' असा दावा त्यांनी केला.

# काँग्रेसचा 'फेक नरेटिव्ह' उघडा पडला - मुख्यमंत्री

## देवेंद्र फडणवीस यांचा घणाघाती आरोप, देशात 'अतिडावी' राजवट आणायचीय



प्रतिनिधी | २७ सप्टेंबर

**नागपूर :** निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेमुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा 'फेक नरेटिव्ह' पूर्णपणे उघडा पडला असल्याचा दावा करत, राहुल गांधी संवैधानिक संस्थांना बदनाम करून देशात अतिडावी राजवट आणण्याचा आणि अराजकता माजवण्याचा प्रयत्न करत असल्याचा घणाघाती आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

संविधानाचे पुस्तक हातात घेऊन घटनात्मक संस्थांवरील जनतेचा विश्वास उडवणे हे राहुल गांधींचे पूर्वनियोजित डिझाइन असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली अराजकतेची भीती आज ते खरी करून दाखवत असल्याचेही फडणवीस यांनी म्हटले. मला असं वाटतं की काल तीनही निवडणूक आयुक्तांनी जी पत्रकार परिषद घेतली त्यामुळे राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा फेक नरेटिव्ह हा पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. मी पहिल्या दिवशीपासून सांगतो आहे राहुल गांधी यांच डिझाईन वेगळं आहे. संविधानाचं पुस्तक हातामध्ये घेऊन संवैधानिक संस्थांवर रोज आरोप लावायचे, संवैधानिक संस्था प्रश्नांकित करायच्या, त्याच्यावरचा लोकांचा विश्वास उडवायचा अशा पद्धतीची कारवाई आहे. भारतीय संविधान ते जरी दाखवत असले तरी त्यांना या संविधानाने दिलेली लोकशाही काही मान्य नाहीये, या संविधानाने तयार केलेल्या संवैधानिक संस्था मान्य नाहीयेत. पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, माझं तर स्पष्ट मत आहे की राहुल गांधींना हळूहळू सर्व संवैधानिक संस्था बदनाम करून भारतीय संविधानावरच प्रश्नचिन्ह उभं करायचं आहे. कारण आता त्यांचं संपूर्ण मानसिकता ही कम्युनिस्ट, साम्यवादी, अतिडावी झालेली आहे आणि त्यांना या भारतामध्ये अतिडावी राजवट आणायची आहे, असा दावाही फडणवीस यांनी केला आहे.

### यांचा मेंदू चोरीला गेलेला!

महाराष्ट्राची आणि इतर काही राज्यांची निवडणुका रद्द करण्यात यावा अशी मागणी केली जात आहे, यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, हे वोट चोरी म्हणतायत पण यांचा मेंदू चोरीला गेलेला आहे. मी तर माननीय पंतप्रधान महोदयांना विनंती करतो की एखादी अशी कमिटी तयार करता येईल का की जी यांचा मेंदू यांना परत आणून देईल जो चोरी गेलेला आहे किंवा त्यांनी गहाण ठेवलेला आहे तो त्यांना परत मिळेल, अशी एखादी व्यवस्था करता येईल का अशी माझी मागणी आहे, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

### हारण्याचं खापर निवडणूक आयोगावर फोडातात

निवडणूक आयोग भाजपचं बी टीम असल्याची टीका विरोधकांकडून केली जाते. यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, जे जे लोक हारतात त्या त्या लोकांना हारण्याचं खापर निवडणूक आयोगावर फोडायची इच्छा असते. तेलंगणाला जिंकल्यानंतर निवडणूक आयोग चांगलं असतं, पंजाबमध्ये जिंकल्यानंतर ते चांगलं असतं, हिमाचलमध्ये जिंकल्यानंतर ते चांगलं असतं, कर्नाटकला जिंकल्यानंतर ते चांगलं असतं, पण भाजप जिंकल्याबरोबर त्याच निवडणूक आयोगाला कोणते शिंग फुटतात मला माहिती नाही आणि मग ते लगेच खराब होतं.

### संविधानावरनं लोकांचा विश्वास उठवण्याचा प्रयत्न

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या शेवटच्या भाषणामध्ये, संविधान सभेमध्ये जे बोलून दाखवलं होतं, जी शंका सांगितली होती आणि ज्या प्रकारची एनार्की (अराजकता) तयार केली जाऊ शकते हे सांगितलं होतं, ते राहुल गांधी स्पष्टपणे करताना दिसतायत. त्यामुळे निश्चितपणे ते हळूहळू या संविधानावरनं लोकांचा विश्वास उठला पाहिजे अशा प्रकारचा त्यांचा प्रयत्न दिसतो, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### एसआयआरसहित सगळ्या प्रक्रिया एक मताने झाल्या

तीनही आयुक्तांनी सांगितलं एसआयआर सहित सगळ्या प्रक्रिया एक मताने झालेल्या आहेत. या प्रक्रियेमध्ये कुठेही डिफरन्स ऑफ ओपिनियन नाहीये. कॅबिनेट सेक्रेटरीकडे गेलेलं पत्र हे कुठल्याही नीतिगत विषयावरच पत्र नाही, कुठल्याही धोरणावरच पत्र नाही, तर एक जी डेपुटेशनवर झालेली अपॉइंटमेंट आहे या अपॉइंटमेंटशी संबंधित पत्र आहे. मात्र जणू काही डिफरन्सेसने पत्र पाठवलेलं आहे असं देखील सांगण्याचा प्रयत्न केलाय, असा आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे.

# आयटीसी सिगरेटची कृत्रिम टंचाई काळाबाजार

## सिगरेट शौकिनांची होतेय लूट !




प्रतिनिधी | २७ सप्टेंबर

**अकोला :** अकोला शहरात सध्या आयटीसी कंपनीच्या सिगरेटचा पुरवठा विस्कळीत झाला असून, बाजारात अचानक कृत्रिम किल्लत निर्माण करण्यात आली आहे. स्टॉकिस्ट आणि घाऊक व्यापाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे सिगरेटप्रेमींची मोठी आर्थिक लूट होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. आगामी काळात सिगरेटच्या किमतीत वाढ (भाववाढ) होणार असल्याच्या शक्यतेने काही बड्या स्टॉकिस्टनी मोठ्या प्रमाणावर माल गोदामातच दाबून ठेवला आहे, परिणामी किरकोळ दुकानदारांचे काउंटर रिकामे पडले आहेत. या वर्षात सिगरेटच्या किंमतीत वाढ झाल्याचे चित्र आहे. फेब्रुवारी ९५ रुपये, मार्च मध्ये ११५ रुपये, आता १२५ रुपये आणि पुढील काळात १३५ रुपयांचे होणारे छोट्या गोल्ड फ्लॅकची किंमत पाहता ही जमाखोरी सुरु असल्याची ओरड आहे. अकोल्यात सिगरेटचा कोट्यावधीचा व्यवसाय आहे.

### गोल्ड फ्लॅक सह प्रमुख ब्रँड्स बाजारातून गायब

बाजारपेठेत सध्या 'गोल्ड फ्लॅक', 'गोल्ड फ्लॅक मिंट', 'इंडिमेट', 'विल्स', 'ब्रिस्टॉल', 'आईस गोल्ड', 'माईल्ड', 'किंग', 'कनेक्ट' आणि 'अमेरिकन' यांसारख्या लोकप्रिय सिगरेट ब्रँड्सचा तुटवडा जाणीवपूर्वक निर्माण केला जात आहे. गोदामांमध्ये सिगरेटचा मोठा स्टॉक तुडुंब भरलेला असतानाही, प्रत्यक्षात बाजारपेठेत ग्राहकांसाठी पुरवठा केला जात नाहीये. यामुळे सिगरेट शौकिनांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत असून, चढ्या भावाने सिगरेट विकत घेण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. सिगरेटच्या किमती वाढण्यापूर्वी जादा नफा कमावण्याच्या उद्देशाने हा सगळा खेळ सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. एकीकडे गोदामात माल असताना दुसरीकडे किरकोळ विक्रेत्यांना आणि ग्राहकांना माघारी जावे लागत आहे. व्यावसायिक नियमांना डावलून सुरू असलेल्या या काळाबाजारावर तातडीने नियंत्रण मिळवणे गरजेचे झाले आहे. सिगरेटची कृत्रिमरीत्या कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या आणि साठेबाजी करून सर्वसामान्य शौकिनांची फसवणूक करणाऱ्या अशा स्टॉकिस्टवर अन्न व औषध प्रशासन किंवा संबंधित यंत्रणेने कठोर कारवाई करावी, अशी मागणी तीव्र होत आहे.

# मतदारसंघातील जिवंत माणसाला मृत दाखविले!

## रोहित पवारांचा आरोप : ज्ञानेशकुमार भाजपच्या हातातले बाहुले

**मुंबई :** भोसले या जिवंत व्यक्तीला एसआयआर यादीत मृत दाखविण्यात आल्याचे त्यांनी दाखवून दिले. तसेच चिंचोली (कर्जत-जामखेड) येथील परशुराम लांडघुले या स्थानिक व्यक्तीलाही कायमस्वरूपी स्थलांतरित दाखवण्यात आल्याचा पुरावा त्यांनी माध्यमांसमोर मांडला. शेवटी, लोकशाही वाचवण्यासाठी आपल्याला ईव्हीएमच्या विरोधातही मोठे आंदोलन उभारावे लागेल, असा निर्धारही रोहित पवार यांनी व्यक्त केला.

पत्रकार परिषदेत बोलताना रोहित पवार यांनी केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर जोरदार टीका केली. केंद्रीय



निवडणूक आयोगाच्या महाराष्ट्रातील कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज पत्रकार परिषदेत पीपीटी सादरीकरण करत अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. लोकसभेला ६ महिन्यात ६.५ लाख मतदार वाढले आणि लोकसभेचा निकाल पाहता विधानसभेला केवळ एका महिन्यात ६.५ लाख मतदार वाढविण्यात आले, हे मतदार कुठून आले आणि कसे आले? असा थेट सवाल रोहित पवारांनी उपस्थित केला आहे. लोकसभा निवडणुकीपेक्षा विधानसभा निवडणुकीत तब्बल ७१ लाख मतदान अधिक झाले असून या संपूर्ण प्रकारात ईव्हीएम मॅनेज केले जात असल्याची जोरदार चर्चा संपूर्ण राज्यात सुरू असल्याचे त्यांनी सांगितले

# धर्म, सण हे घरापुरतेच मर्यादित ठेवले पाहिजे!

प्रतिनिधी | २७ सप्टेंबर

**पुणे :** मला एवढंच म्हणायचं आहे की, धर्म असू दे, सण असू दे, हा घरापुरताच मर्यादित ठेवला पाहिजे, जर आपल्या मुली, आपली मुलं, वर्ल्ड कप जिंकून आली, तर सर्वांनी मिळून जल्लोष करू. आपण सर्वांनी मिळून रस्त्यावर नाचूया, दुसरे करतात म्हणून आपण नको करायला, आपण भविष्याचा विचार करूया आणि आपल्यामध्ये काय काय चुका आहेत, ते आपण सुधारणे फार गरजेचे आहे, मी विद्यानंदाचे आभार मानतो आणि त्याचे अभिनंदन करतो, असे मत सुमित राघवनने व्यक्त केले.




## डीजेविरोधातील लढ्यात सुमित राघवनचे पुण्यात वक्तव्य, विद्यानंद बापटांना दिला पाठिंबा

पुण्यात डीजेच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या विद्यानंद बापट यांचा आज (रविवारी, ता २७) जेष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते गौरव करण्यात येणार आहे. 'मधुरजग प्रतिष्ठान' आणि 'ब्राईट्स सोसायटी' आणि विचारवेध या संस्थांतर्फे विद्यानंद बापट यांच्या या गौरव सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. जेष्ठ अभिनेते अमोल पालेकर यांच्या हस्ते विद्यानंद बापट यांचा सत्कार करण्यात आला आहे. स्टेजवर सुमित राघवन आणि चिन्मयी सुमित हे उपस्थित आहेत. यावेळी बोलताना सुमित राघवनने डीजेच्या विरोधात आपली परखड भूमिका व्यक्त करत विद्यानंद बापटांना आपला पाठिंबा दर्शवला आहे आणि बापटांना पुढे लढत राहा आम्ही देखील तुझ्या सोबत आहे असंही म्हटलं आहे.

# डीव्हीके समाजाची दलित समुदायातून बाहेर पडण्याची इच्छा!

## सामाजिक सन्मानासाठी लढा,एससी/एसटी कायद्याचाही वापर न करण्याचा निर्णय

प्रतिनिधी | २७ सप्टेंबर

**चेन्नई :** एकीकडे देशात आरक्षणाच्या सवलतीसाठी अनेक जाती, स्वतःला मागास घोषित करण्यासाठी धडपडत असतानाच, तमिळनाडूतील 'देवेंद्रकुला वेल्लालर' (डीव्हीके) हा समाज अनुसूचित जातीच्या अर्थात एससी यादीतून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत आहे. एवढेच नाहीतर, यापुढे कुणावरही एससी/एसटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल न करण्याचा निर्णय या समाजाने घेतला आहे. कारण या कायद्याच्या गैरवापरामुळे सामाजिक कटुता आणि वैर वाढते, असे त्यांचे म्हणणे आहे.

तमिळनाडूच्या एकूण लोकसंख्येचा विचार करता, या समाजाचा वाटा ५ ते ९ टक्के एवढा आहे. हा समाज प्रामुख्याने शेती आणि पशुपालन व्यवसाय करतो.



आपण ही मागणी आर्थिक कारणांसाठी नव्हे तर आत्मसन्मान आणि सामाजिक प्रतिष्ठेसाठी करत असल्याचे या समाजाने स्पष्ट केले आहे. समाजात एससी टॅगमुळे लागलेला कलंक त्यांच्या उद्योग-व्यवसायात आणि सर्वांगीण विकासात अडथळा ठरत असल्याचे त्यांच्या नेत्यांचे म्हणणे आहे. या समाजाची मागणी आहे की, त्यांना आधी एससी यादीतून काढून इतर मागासवर्गीय अर्थात ओबीसी प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे. यानंतर १० ते १५ वर्षांनी थेट सामान्य प्रवर्गात समाविष्ट करण्यात यावे.

### ७ पोटजाती करण्यात आल्य एकत्र

महत्त्वाचे म्हणजे, मार्च २०२१ मध्ये संसदेमध्ये एक विधेयक मंजूर करून पल्लारसह ७ उपजातींना 'देवेंद्रकुला वेल्लालर' अशी नवीन ओळख देण्यात आली. तत्कालीन भाजप अध्यक्ष आणि गृहमंत्री, अमित शाह यांनीही समाजाच्या सामाजिक उन्नतीसाठीच्या प्रयत्नांची प्रशंसा केली होती.

### स्वातंत्र्योत्तर भारतातील पहिलेच प्रकरण

एकीकडे धर्मांतरित ख्रिस्ती गट या मागणीला विरोध करत असताना, हिंदू परंपरेशी जोडलेला बहुसंख्य डीव्हीके समाज या निर्णयावर ठाम आहे. खरे तर, सामाजिक सन्मानासाठी आरक्षण धुडकावत एससी/एसटी कायदा नाकारत, स्वतःला एससी यादीतून बाहेर काढण्याची मागणी हा समाज करत आहे. ही स्वतंत्र भारताच्या इतिहासातील पहिलीच घटना ठरते.

# रविवार असूनही आज बँका सुरुच, संपामुळे तीन दिवस बँका बंद

**अकोला :** कर्मचाऱ्यांनी उद्या सोमवारपासून तीन दिवस संप पुकारला आहे. या काळात बँका बंद राहणार असल्याने ग्राहकांची गैरसोय होऊ नये, यासाठी जिल्ह्यासह शहरातील बँका रविवार सुटीचा दिवस असूनही सुरूच होत्या. यावेळी अनेक नागरिकांनी पैस काढण्यासाठी बँकेत गर्दी केली होती. नोटबंदीच्या काळानंतर दहा वर्षांनंतर प्रथमच सुटीच्या दिवशीही बँका सुरू राहण्याची ही पहिलीच वेळ असल्याची प्रतिक्रिया यावेळी उमटत होत्या.

बँकेशी संबंधित तुमचे कोणतेही काम प्रलंबित असेल, तर ते आजच करून घ्या. रविवारची सुट्टी असूनही आज सरकारी




बँका सुरू राहतील. उद्यापासून बुधवारपर्यंत बँका बंद राहतील. बँक कर्मचारी आठवड्यात २ दिवसांच्या सुट्टीच्या मागणीसाठी पुढील ३ दिवस संपावर जाणार आहेत. रविवारी बँका सुरू राहण्याची संधी १० वर्षांनंतर आली आहे. यापूर्वी २०१६ मध्ये नोटाबंदीनंतर १४ नोव्हेंबरला रविवारी बँका सुरू होत्या. त्यावेळी जुन्या ५०० आणि १००० रुपयांच्या नोटा बदलण्यासाठी, जमा करण्यासाठी आणि रोख रक्कम काढण्यासाठी लोक बँकांमध्ये मोठ्या संख्येने गर्दी करून आले होते. गर्दी नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकारने रविवारीही बँका सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला होता.

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

## रौप्य महोत्सव विशेष



### सर्वसमावेशक अन् वास्तव लिखाण हेच केंद्रबिंदू - कुलगुरू डॉ. शरद गडाख

1 आरआरसी समूहाने अल्पवधीतच चॅनल व वृत्तपत्र क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. याचे मुख्य कारण म्हणजे सर्वसमावेश अन् वास्तव लिखाण आहे. जे आहे ते स्पष्टपणे नमूद करणे हेच या समूहाचे केंद्रस्थानी आहे. त्यामुळे हे मीडियाच्या क्षेत्रात अधिक उच्च स्थानी पोहोचावे, हीच सदिच्छा असे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख म्हणाले.

### परखड बातम्या हेच आरआरसीचे बलस्थान - जयंत मसने

2 आरआरसी आणि माझा खूप आधीपासून घनिष्ठ संबंध आहेत. मात्र व्यवसाय आणि मित्रता यात कधीच सरमिसळ होऊ दिली नाही. त्यामुळेच वृत्तपत्र असो की चॅनेल यांच्या बातम्या ह्या पारदर्शकपणे सामान्य वाचकांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य सातत्याने आरआरसी करीत आहे आणि हेच या समूहाचे खरे बलस्थान आहे. त्यामुळे लवकरच ते सुवर्ण महोत्सवही साजरा करणार असल्याचा आशावाद भाजपाचे शहराध्यक्ष जयंत मसने यांनी वर्तविला.





### आरआरसी समूह हा नेहमी सत्याच्या पाठीशी- आशिष पवित्रकार

3 माझ्या अडचणीच्या काळात आरआरसी समूह खंबीरपणे माझ्या पाठीशी उभा राहिला आहे, असे अनेक जण म्हणतात. मात्र खऱ्या अर्थाने हा समूह वृत्तपत्र व चॅनलच्या माध्यमातून सत्याच्या पाठीशी होता, हेच मला म्हणायचे आहे. या समूहाने रजत महोत्सव साजरा केला, आता त्यांनी सुवर्ण महोत्सव साजरा करावा, हीच माझी अपेक्षा आहे, असे मत अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांनी व्यक्त केले.

### निष्पक्ष अन् पारदर्शकता ही या समूहाची खासियत- पंकज साबळे

4 आरआरसी समूहाला कोणत्याच पक्षाविषयी ममत्व नाही. सर्व पक्ष त्यांच्या दृष्टीने समान आहेत. त्यामुळे आरआरसीचे वृत्तपत्र असो की चॅनल यावरून प्रसारित होणाऱ्या बातम्या ह्या आरशाप्रमाणे वास्तव स्थिती दाखविणाऱ्या असतात. त्यामुळेच या समूहाने २५ वर्ष निर्भीडपणे आणि यशस्वीरीत्या पार केले आहेत, असे मनोगत मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे यांनी व्यक्त केले.





### सर्वच क्षेत्रात दबंग कामगिरी माजी आ. श्रीकांत देशपांडे

5 समाजातील सर्वच क्षेत्रातील वंचित, उपेक्षित घटकांना व समस्यांना थेट हात घालण्याचे सामर्थ्य आरआरसी समूहात आहे. त्यांनी सर्वांनाच समान न्याय दिलेला आहे. मग ते राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक कोणतेही क्षेत्र असो, त्यावर त्यांनी परखडपणे प्रहार केला आहे. त्यामुळे अल्पावधीतच हा समूह जनसामान्यांपर्यंत पोहोचला आहे, असे प्रतिपादन माजी शिक्षक आ. श्रीकांत देशपांडे यांनी केले.

### शैक्षणिक क्षेत्राच्या समस्यांना वाचा फोडणारा समूह - प्रा. प्रकाश डवले

6 शिक्षक आणि शैक्षणिक समस्यांवर सातत्यपूर्ण लिखाण करून वस्तुस्थिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम आरआरसी समूह वृत्तपत्र आणि चॅनलच्या माध्यमातून करीत आहे. त्यांना कोणत्याच क्षेत्राचे वावडे नसून जेथे अन्याय होत आहे, तेथे हा समूह धाव घेत तो प्रश्न धसास लावतो, ही फार मोठी गोष्ट आहे. त्यामुळे आरआरसी समूहाची अशी प्रगती होत राहो, अशी सदिच्छा डवले शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रकाश डवले यांनी व्यक्त केली.





### सत्याची बाजू मांडणारे आरआरसी - डॉ. रावणकर

7 आरआरसी म्हणजे सत्य. हे एक समीकरण झालेले आहे. समाजाला आरसा दाखविण्याचे अविरत कार्य हा समूह करीत असताना शासन-प्रशासनावर सडेतोड प्रहार करण्यासही ते मागेपुढे पाहत नाही. त्यांचे ध्येय एकच सर्वसामान्यांना न्याय मिळायला हवा.

### जनतेच्या समस्यांना वाचा फोडणारा समूह - गोपाल दातकर

8 सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न उचलून धरून त्यांचा सातत्याने पाठपुरावा करून न्याय मिळवून देणार आरआरसी समूह आहे. त्यामुळेच सर्वसामान्यांना हे वृत्तपत्र व चॅनेल आपले वाटते. तसेच लोकांच्या हक्कासाठी पेटून उठत असल्याने ते अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. त्यांच्या या यशस्वी कारकीर्दीसाठी आमच्याही शुभेच्छा, असे मत गोपाल दातकर यांनी व्यक्त केले.





### वंचित घटकांना न्याय देण्यासाठी झगडणारे आरआरसी- पराग गवई

9 गोरगरीब, उपेक्षित व वंचित घटकांच्या उत्थानासाठी आरआरसी समूह सातत्याने पुढाकार घेत आला आहे. आपल्या वृत्तपत्र व चॅनलच्या माध्यमातून त्यांच्या घराघरांत पोहोचून त्यांना न्याय दिला आहे. त्यांचे हे कार्य सर्वसामान्यांना दिलासा देणार असल्याने जनमानसात आरआरसी बद्दल वेगळीच आपुलकीची भावना निर्माण होत आहे, असे मत नगरसेवक पराग गवई यांनी व्यक्त केले.




### सर्वांना सोबत घेऊन चालणार समूह - प्रदीप खाडे

10 मीडियाच्या क्षेत्रात सर्वांना सोबत घेऊन चालणे ही फार मोठी गोष्ट आहे, मात्र आरआरसी समूहाने एक ब्रिद म्हणून ते पाळले आहे. समाजातील वैगुण्यावर नेमके बोट ठेवून ते दूर करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न हा समूह नियमित करीत असल्यानेच त्यांची वाटचाल यशोशिखराकडे सुरू आहे. ती अशीच निरंतर सुरू राहो, ही मनोकामना प्रदीप खाडे यांनी व्यक्त केली.





### मीडिया क्षेत्रात अल्पवधीत आपले वेगळे स्थान निर्माण केले - शैलेश खरोटे

11 मीडिया क्षेत्रात झपाट्याने बदल होत असून, अनेक वृत्तपत्र व चॅनेलची त्यात भर पडत आहे. असे असतानाही आरआरसी समूहाने अल्पावधीतच आपली वेगळी ओळख निर्माण केली असून, काळानुरूप बदल करीत असल्यानेच ते आपले ध्येय गाठत आहे. त्यांच्या या कार्यास सराफा असोसिएशनकडून शुभेच्छा, असे मत सराफा असो.चे अध्यक्ष शैलेश खरोटे यांनी व्यक्त केले.

### सांस्कृतिक, धार्मिक क्षेत्रालाही समान न्याय- मधु जाधव

12 सर्व घटकांना समान न्याय देऊन मीडिया क्षेत्रात संतुलन साधतया समूहाची वाटचाल सुरू आहे. सांस्कृतिक घडामोडींना अनेक वृत्तपत्र स्थान देताना मागे-पुढे पाहतात. मात्र आरआरसी समूहाने या सर्वांना समान न्याय दिला आहे. त्यामुळे त्यांच्या प्रगतीत वाढ होत आहे. लवकरच हा समूह आपला सुवर्ण महोत्सव साजरा करेल, अशी मनोकामना मधु जाधव यांनी व्यक्त केली.





### आरआरसी समूहाने विशिष्ट स्थान निर्माण केले - रामप्रकाश मिश्रा

13 अमरावती विभागात आर आर सी चॅनेलने विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. विश्वासार्हता जपल्यामुळे पंचवीस वर्षांची यशस्वी वाटचाल झाली. यापुढे देखील आर आर सी परिवार उज्वल यश प्राप्त करेल अशी सदिच्छा उद्योगपती रामप्रकाश मिश्रा यांनी व्यक्त केली.

### आरआरसी समूहची कामगिरी दमदार - रफिक सिद्दीकी

14 माजी उपमहापौर रफिक सिद्दीकी म्हणाले, आर आर सी नेटवर्कशी सुरूवातीपासून आम्ही जुळलो आहोत. या भागातील पत्रकारितेत आर आर सी ने आपले स्थान निर्माण केले आहे. यापुढे देखील आर आर सी परिवाराची दमदार प्रगती होवो अशी सदिच्छा व्यक्त केली

### नि:पक्ष पत्रकारितेचा घेतला वसा - राजेश मिश्रा

15 शिवसेना शहर प्रमुख राजेश मिश्रा यांनी आर आर सी च्या रौप्य महोत्सवी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. या चॅनेलने नि:पक्षपणे पत्रकारिता करून आपले स्थान निर्माण केले आहे असे सांगितले.

### यशाची कामना अशीच उंचावत राहो - सुरेश पाटील

16 माजी महापौर सुरेश पाटील म्हणाले, देशमुख कुटुंबाशी आपले पारिवारिक संबंध आहेत. आर आर सी चॅनेलच्या विस्तारात बंडूभाऊ देशमुख, पंकज देशमुख यांचा महत्त्वाचा वाटा आहे. रौप्य महोत्सव साजरा करण्याची सुवर्ण संधी चॅनेलला मिळाली. यापुढे देखील यशाची कमान उंचावत राहील अशी सदिच्छा सुरेश पाटील यांनी व्यक्त केली

### विश्वासार्हत जपल्यानेच यश - विजय केडिया

17 आर आर सी चॅनेलने विश्वासार्हता जपल्यामुळे पंचवीस वर्षे पूर्ण झाली असे केडिया क्लासेसचे विजय केडिया म्हणाले. आज पत्रकारितेत टिकून राहणे सोपे नाही. स्पर्धा करावी लागते परंतु आर आर सी परिवाराने हे शिवधनुष्य पेलले आहे. पुढील प्रवासाला शुभेच्छा देतो.

### आपली वेगळी ओळख निर्माण करणारा समूह - कोठारी कन्स्ट्रक्शन

18 अमरावती विभागाच्या पत्रकारितेत आर आर सी चॅनेलने आपली ओळख निर्माण केली आहे. विश्वासार्हता जपल्यामुळे हा टप्पा गाठला असे कोठारी कन्स्ट्रक्शनचे विजयभाऊ यांनी मत व्यक्त केले. तसेच रौप्य महोत्सवाच्या आर आर सी परिवाराला शुभेच्छा दिल्या.

### समूहाने मीडिया क्षेत्रात स्वतंत्र स्थान निर्माण केले - महादेवराव भुईभार

19 कृषी कीर्तनकार महादेवराव भुईभार यांनी आर आर सी चॅनेलच्या रौप्य महोत्सवी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या.धकाधकीच्या काळात चॅनेलने स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. या पुढील काळात देखील उज्वल यश चॅनेलला मिळावे अशी सदिच्छा व्यक्त केली.

### आरआरसी समूहाचे यश डोळ्यात भरणारे - प्रिती कमाविसदार

20 आर आर सी चॅनेलची यशस्वी वाटचाल डोळ्यात भरणारी आहे. रौप्य महोत्सवी सोहळा अतिशय दिमाखात साजरा झाला. यापुढे वाटचाल देखील दैदिप्यमान व्हावी असे प्रिती कमाविसदार म्हणाल्या.

### अशी यशाकडे वाटचाल सुरू रहावी - जया भारती

21 आर आर सी चॅनेल रौप्य महोत्सव साजरा करीत आहे ही आनंदाची गोष्ट आहे. चॅनेलची यशस्वी वाटचाल आपण देखील पाहिली आहे. येत्या काळात देखील यशाची कमान दिमाखात उंचावत राहावी अशी सदिच्छा आरजे जया भारती यांनी व्यक्त केली.

### नवनवे शिखरे पादाक्रांत करावी - श्याम सारभुकन

22 आशु ॲडचे संचालक श्याम सारभुकन यांनी आर आर सी चॅनेलच्या रौप्य महोत्सवी सोहळ्याला शुभेच्छा दिल्या. येत्या काळात देखील यशाचे शिखर पादाक्रांत करावे अशी सदिच्छा श्याम सारभुकन यांनी व्यक्त केली.

### उपेक्षित, वंचित घटकांना न्याय देणारा समूह - कवी किशोर बळी

23 जेथे अन्याय होतो तेथे पोहोचतो तो आरआरसी समूह, ही ओळख मिळविण्यासाठी आरआरसी समूहाने २५ वर्षांपासून खडतर परिश्रम घेतले आहे. समाजाचा आरसा म्हणून या समूहाने काम केल्यामुळे समाजाच्या उपेक्षित, वंचित घटकांपासून सर्वांनाच समान न्याय देण्याचे कार्य सातत्याने केले आहे आणि हीच या समूहाची खरी ताकद आहे, असे मत कवी किशोर बळी यांनी व्यक्त केले आहे.

### बहुजन समाजाच्या कायम पाठीशी असलेला समूह - अशफाक बेग

24 सर्वच सामाजाला न्याय देण्याचे व्रतच या समूहाने घेतले आहे. त्यामुळे छोट्यात छोट्या समाजाच्या व्यथेला वाचा फोडण्याचे काम हा समूह करीत असतो. या समूहाच्या कायम पाठीशी असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये खोलवर रूजली आहे. त्यामुळे हा समूह लोकप्रियतेच्या यशोशिखरावर पोहोचला आहे, ही प्रगती कायम अशीच वाढत जावी, हीच प्रार्थना अशफाक बेग यांनी व्यक्त केली.

### शैक्षणिक सोबतच सांस्कृतिक क्षेत्रातही आघाडीवर असलेला समूह- ॲड. वल्लभ नारे

25 आरआरसी समूह वृत्तपत्र आणि केबलच्या माध्यमातून घराघरात पोहोचले आहे. ही त्यांच्या कठोर परिश्रमाचे फलीत आहे. त्यांनी शैक्षणिक क्षेत्रासोबतच सांस्कृतिक क्षेत्रातील बातम्या सातत्याने देत आहे.







सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि. २७ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि. ४ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

डाबेराव यांच्या भ्रष्टाचाराचा भरला घडा, आता वाशीम जिल्ह्याच्या बाहेर पडा !

वाशीम जिल्हा परीषदेत भूकंप १८ शिक्षक संघटना एकवटल्या

• सिटी न्यूज ब्युरो @ कारंजा •

वाशिम जिल्हा परीषद शिक्षण विभागातील शिक्षकांच्या पदोन्नती, पदावनत समायोजन, खाजगी समायोजन व इतर सेवा विषयक प्रकरणामध्ये गेल्या तेरा वर्षांपासून प्रचंड मनमानी, शासन निर्णयाची पायमल्ली व शिक्षकांची आर्थिक, मानसिक पिळवणूक केल्याचा गंभीर आरोप असलेले वादग्रस्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी वाशिम गजानन डाबेराव यांच्या विरोधात

संघटनेचा तीव्र आंदोलनाचा इशारा

सदर निवेदनाची तात्काळ हे दखल घेऊन प्रशासनानित्यांची वाशिम जिल्ह्यातून उचलबांगडी करावी अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शिक्षक संघटनानी दिला आहे. या प्रकरणामुळे वाशिम जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून भ्रष्ट अधिका-यांचे धाबे दणाणले आहेत. याप्रसंगी आयुक्त कार्यालय कोणते ठोस पाऊल उचलणार याकडे संपूर्ण शिक्षकांचे लक्ष लागले आहे.

विविध आरोपाच्या कारणावरून त्यांचेकडून प्रशासनाने काही दिवसापूर्वी उपशिक्षणाधिकार पदाचा प्रभार काढून वाशिम पं.स. सोयीने अर्थ लावून अनेक वेळा चक्रव्यूह रचून आजपर्यंत शिक्षकांची आर्थिक, मानसिक पिळवणूक केली आहे. या दडपणाखाली संपूर्ण शिक्षक वर्गाचे पदावनत इतर सेवाविषयक प्रकरणामधील प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशी करावी, अशी मागणी संयुक्त निवेदनात

# जि.प.शिक्षण विभागात अनियमितेची हद्द, नियमबाह्य केलेले शिक्षकांचे समायोजन अखेर रद्द !

## *विभागीय आयुक्तांना दिले खुद्द *भ्रष्ट अधिकाऱ्याची हुकूमशाही सिद्ध

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

मागील दोन महिन्यांपूर्वी वाशिम जिल्हा परिषद शिक्षण विभागात शासन निर्णय डावलून मनमानी, हूकुमशाही पद्धतीने २२ जुलै २०२६ रोजी शिक्षकांचे समायोजन करण्यात आले होते. या अन्यायकारक झालेल्या समायोजनामुळे जवळपास दहा शिक्षकांना आपल्या तालुक्यापासून शंभर किलोमीटर पेक्षा दूर असलेल्या शाळांवर समायोजनाने पदस्थापना देण्यात आल्या होत्या .या अन्यायकारक व शासकीय नियमांना डावलून करण्यात आलेल्या पदोन्नती विरोधात जिल्ह्यातील दहा शिक्षकांनी आयुक्त ,अमरावती विभाग अमरावती यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांच्या विरुद्ध एडवोकेट दिलीप गावंडे यांच्यामार्फत तक्रार करून न्यायाची मागणी केली.

या तक्रारीच्या चौकशीसाठी विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी चौकशी समिती स्थापन करून दिनांक १८/ ८/ २०२६ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणी करिता तक्रारदार यांच्यावतीने एडवोकेट दिलीप गावंडे यांनी बाजू मांडली तर उत्तरार्थी यांचे वतीने शिक्षणाधिकारी प्राथमिक विठ्ठल भुसारे व शिक्षणाधिकारी कार्यालयीन कर्मचारी उपस्थित होते. उत्तरार्थी यांनी सुनावणी दरम्यान दिलेल्या तोंडी जबाबाने समाधान न झाल्याने संबंधितास लेखी स्पष्टीकरण मागण्यात आले. त्यानंतर वाशिम जि. प. शिक्षण विभागाने सादर केलेल्या लेखी स्पष्टीकरणांमध्ये अनेक त्रुटया व अनियमितता आढळून आल्या. चौकशी समितीने दिलेल्या अभिप्रायात शासन निर्णय दिनांक १८/ ५/ २०१९ नुसार समायोजन प्रक्रिया समुपदेशनाने करणे बंधनकारक असल्याचे नमूद करून शासन निर्णय दिनांक १८/८/२०१२ अन्वये दिव्यांग कर्मचारी यांना समायोजन प्रक्रियेतून पूर्णतः वगळण्यात यावे असे निर्देश आहे असे असताना दिव्यांग कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्यात आल्याने शासन निर्णयांचे उल्लंघन झाले




असल्याचे स्पष्ट झाले.

या समायोजन प्रक्रियेत अनियमिततेचा कळस गाठत जिल्हा परिषद शिक्षण विभागाने शासन निर्णय दिनांक १५/ ५/ २०२४ मधील मुद्दा क्रमांक २(२)अन्वये सर्व शाळेतील रिक्त पदांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे परंतु तसे झाले नसल्याचे या प्रक्रियेत दिसून आले. शासन निर्णय दिनांक १५/३/ २०२४ मधील मुद्दा क्रमांक आठ नुसार प्राथमिक शाळेत पद रिक्त नसल्यास माध्यमिक शाळेत समान वेतनश्रेणीचे पद रिक्त असल्यास त्यावर समायोजन करावे असे निर्देश असताना मनमानी करण्यात आली. तसेच शासन निर्णय दिनांक १८/ ५/ २०१९ मधील निकषांचे पूर्णपणे पालन केले नसल्याचा अभिप्राय समितीने दिलाआहे.एकूणच शासन निर्णय डावलून समायोजनाची प्रक्रिया समुपदेशनाने व उपलब्ध रिक्त पदे दर्शवून न झाल्याने सरळ सरळ शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्याचे या चौकशी समितीत निष्पन्न झाल्याने अमरावती विभागाच्या कर्तव्यदक्ष आयुक्त नयना गुंडे यांनी आदेश दिला की, जिल्हास्तरावरील नऊ तक्रारदार शिक्षक व तालुकास्तरीय एक शिक्षक यांचे समायोजनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी वाशिम यांनी शासन निर्णय दिनांक १८ /५ /२०११ व शासन निर्णय दिनांक १५/ ३/ २०२४ मधील तरतुदीनुसार पंधरा दिवसाच्या आत समायोजन प्रक्रिया पार पाडावी असे आदेशित केले.

त्यामुळे अन्यायग्रस्त शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून वाशिम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मनमानी कारभाराला एक प्रकारे चपराक बसली आहे.या अन्यायकारक समायोजना मुळे त्रस्त झालेल्या शिक्षकांना पाठिंबा म्हणून जिल्ह्यातील शिक्षक संघटनांनी तसेच अन्यायग्रस्त शिक्षक व शिक्षक संघर्ष समितीने हे नियमबाह्य समायोजन रद्द करण्यासाठी दिनांक ७ सप्टेंबर २०२६ रोजी धरणे आंदोलन केले होते. तसेच अन्यायकारक शिक्षक व जिल्हा संघर्ष समिती ने १६ सप्टेंबर रोजी माननीय आयुक्त यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन देऊन हा प्रश्न निकाली लावण्याबाबत विनंती केली होती. त्याचबरोबर जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना याबाबत अवगत करून न्याय मागितला होता. त्यानुसार जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी वाशिम यवतमाळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार संजयभाऊ देशमुख, अमरावती शिक्षक मतदार संघाचे आमदार किरणराव सरनाईक, रिसोड विधानसभा मतदार संघाचे आमदार अमितभाऊ झनक, वाशिम- मंगरूळपीर विधानसभा मतदार संघाचे आमदार श्याम भाऊ खोडे, कारंजा विधानसभा मतदार संघाच्या आमदार सईताई डहाके, हिंगोली मतदार संघाचे आमदार संतोष भाऊ बांगर, विधान परिषद आमदार भावनाताई गवळी, शिवसेना उबाठा गटाचे जिल्हाध्यक्ष बालाजी वानखेडे ,मंगरूळपीर तालुका शिवसेना(उबाठा) अध्यक्ष अर्जुन सुर्वे, भाजपाचे राज्य सरचिटणीस राजू पाटील राजे, भारतीय काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजूभाऊ चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे, शिवसेना शिंदे गटाचे युवा जिल्हाध्यक्ष रवी भांदुर्गे, ज्येष्ठ नेते महादेवराव ठाकरे यांनी तक्रारीची दखल घेऊन माननीय आयुक्तांना याप्रकरणी चौकशी करून कारवाई करण्याचे लेखी पत्र दिले होते. तसेच विभागीय कार्यालयात अन्यायकारक शिक्षकांची कायदेशीर ,भक्कम बाजू ?ड. दिलीप गावंडे यांनी मांडली त्यामुळे शिक्षकांना न्याय मिळाल्याचे अन्यायग्रस्त शिक्षकांनी सांगितले आहे.

## थोडक्यात

### ग्रंथ प्रदर्शनास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



• सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर •

यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरूळपीर येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने स्व. सौ. कोकिळाताई सुभाषराव ठाकरे यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून दिनांक २२ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालयीन ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे सर यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी, त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी तसेच शैक्षणिक आणि स्पर्धात्मक परीक्षांच्या तयारीसाठी आवश्यक संदर्भ साहित्याची माहिती मिळावी, या उद्देशाने या ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सुरुवातीला ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. मनोज कडू यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. प्राचार्य सुर्वे सर यांनी ग्रंथांचे आपल्या आयुष्यामध्ये काय महत्त्व आहे याविषयी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण होण्यास तसेच ज्ञानाच्या कक्षा विस्तारण्यास निश्चितच मदत होईल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. मनोज कडू तसेच ग्रंथालय कर्मचारी विठ्ठल बोरचाटे, पवन येवले यांनी परिश्रम घेतले.

# महिन्या भरात रेती टिप्परचे चार अपघात !

## *राज्य महामार्गावर अवैध रेती वाहतूक करणारे टिप्परचे दोन अपघात *महसूल विभागाच्या कार्यशालीवर प्रश्न चिन्ह





• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

रिसोड तालुक्यात दर दिवसाला हजारो ब्रास अवैध रेतीची वाहतूक करणाऱ्या एका भरधाव टिप्परचा भीषण अपघात झाल्याची घटना काल दुपारी आकाराच्या सुमारास समोर आली आहे.

दुसरी कडे मांगवाडी येथे रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परर्ने चार चाकी बलोनी गाडीचा मोठा अपघात झाला असून रिसोड तालुक्यात दर दिवसाला अवैध रेती भरून अत्यंत वेगाने जाणाऱ्या एका टिप्परचे चालकावरील नियंत्रण सुटल्यामुळे टिप्पर राज्य महामार्गावर उलटला. टिप्परमध्ये क्षमतेपेक्षा जास्त (ओव्हरलोड) रेती भरलेली होती.टिप्पर पलटी झाल्यानंतर त्यामधील सर्व अवैध रेती रस्त्याच्या कडेला एक मोठ्या खाद्यात पडली आहे. अपघात झाला त्या वेळी राज्यमार्गावर इतर कोणतेही वाहन किंवा पादचारी नसल्याने मोठी जीवितहानी टळली.।ाशिमच्या दिशेने जाणारा एक अवैध रेती वाहतूक करणारा भरधाव टिप्पर राज्य महामार्गावरील रिसोड जवळील वन विभाग गार्डन जवळ पलटी झाल्याची घटना २६ सप्टेंबर रोजी दुपारी अकरा वाजताच्या दरम्यान घडली आहे.

अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर गेल्या काही दिवसांपासून रात्री वेळी शहरातून भरधाव वेगाने धावत असल्याचे नागरिकांकडून बोलले जात आहेत. मात्र या कडे महसुल प्रशासनाकडून अर्थपुर्ण दुर्लक्ष केले जात असल्याचे बोलले जात आहे. रिसोड तालुक्यात अवैध रेती वाहतूक करणा-या तस्करावर महसूल व पोलीस प्रशासनाकडून काय कार्यवाई होते या कडे नागरिकांचे लक्ष लागले आहेत.

**तहसीलदार रिल्स काढण्यात मस्त, रेती वाहतूक जबरदस्त.....!**

सध्या बहु चर्चेत असलेल्या रील्स स्टार तहसीलदार यांच्या कार्यक्षमतेवर तालुका भर चर्चा होत असून दर दिवसाला हजारो ब्रास रेती वाहतूक केली जात असून महसूल विभाग अर्थपूर्ण भूमिका घेत असल्याची चर्चा तालुका भर होत आहे. याच एका महिन्यात रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परचे चार अपघात झाले आहेत रेती वाहतूक करणाऱ्या पुष्पाला महसूल विभाग पोलिस प्रशासन यांचा काही धाक राहिलेला नसून भर दिवसा अवैध रेती वाहतूक भरधाव वेगाने होत असून एका महिन्यात चार अपघात झाले असता महसूल विभाग मोठ्या अपघाताची वाट तर नाही बघताना असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# राज्यात दुष्काळ जाहीर

## वाशीमच्या सहाही तालुक्यांचा समावेश




• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने खरीप हंगामावर परिणाम झालेल्या राज्यातील भागांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये वाशिम जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, मालेगाव, मंगरुळपीर, मानोरा आणि कारंजा या सहाही तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार विविध सवलती व मदतीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या अनियमिततेचा पिकांवर परिणाम झाला आहे. काही भागांत पिकांची वाढ खुंटली असून, उत्पादनावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ जाहीर करण्याच्या निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले होते. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर शासनाच्या निकषांनुसार शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाईसह विविध सवलती आणि उपाययोजनांचा लाभ मिळू शकतो. यासाठी संबंधित विभागांकडून पुढील कार्यवाही केली जाणार आहे. दरम्यान, प्रत्यक्ष मदत व सवलतींचे स्वरूप काय असेल, तसेच त्याची अंमलबजावणी कधीपासून होणार, याबाबत शेतकऱ्यांचे लक्ष शासनाच्या पुढील निर्णयाकडे लागले आहे.

# पिण्याच्या पाण्याचे काटेकोर नियोजन करा - जिल्हाधिकारी

## संभाव्य पाणीटंचाई उपाययोजना आढावा सभा

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

जिल्ह्यातील संभाव्य पाणीटंचाईच्या परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिण्याच्या पाण्याचे नियोजन आतापासूनच काटेकोरपणे करावे. उपलब्ध पाणीसाठ्याचे योग्य नियोजन करून नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरळीत राहील, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.





जिल्हाधिकारी कार्यालयातील काटेपूर्णा व्हीसी दालनात आयोजित संभाव्य पाणीटंचाई उपाययोजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान,निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता कानेरकर, महावितरणचे अधीक्षक अभियंता संदीप दरवडे, जिल्हा जलसंधारण अधिकारी हरेंद्र वाघमारे,नगरपालिका प्रशासन सहआयुक्त डॉ.बाबुराव बिक्कड, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, नगरपालिका मुख्याधिकारी अरविंद मुंढे यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.जिल्हाधिकारी कुंभेजकर बोलतांना म्हणाले, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाने प्रत्येक गावाचा स्वतंत्र आढावा घेऊन पिण्याच्या पाण्याची उपलब्धता ३१ ऑगस्ट २०२७ पर्यंत कायम राहील, यासाठी आवश्यक नियोजन करावे. यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी गट विकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता व शाखा अभियंता यांच्या पंचायत समितीनिहाय तातडीने आढावा बैठका घ्याव्यात. ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या मुख्य व वितरण पाईपलाईनची दर १० दिवसांनी तपासणी करून गळती आढळल्यास तातडीने दुरुस्ती करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिल्या.पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर व्यापक जनजागृती करावी. प्रसारमाध्यमांतून प्रसिद्धीपत्रके जारी करण्यासोबतच जलदूत, प्रशासक, सरपंच व माजी सरपंच यांनी गावकऱ्यांशी थेट संवाद साधून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.जिल्ह्यातील प्रकल्प व तलावांमधून रात्रीच्या वेळी बेकायदेशीरपणे पाणी उपसा रोखण्यासाठी महावितरणने सजग राहावे . एकबुर्जी प्रकल्पातील अवैध सिंचन पाणी उपसा रोखण्यासाठी विशेष लक्ष देऊन तेथील बेकायदेशीर वीज जोडण्या तात्काळ खंडित कराव्यात, असे निर्देशही महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आले.धरणे व तलावांवर अचानक रात्रपाळी पाहणी करण्यासाठी नगर परिषद, महावितरण, पाटबंधारे, लघु पाटबंधारे तसेच मृद व जलसंधारण विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश असलेली संयुक्त गस्ती पथके स्थापन करुन संबंधित विभागांनी आपल्या प्रतिनिधींची नावे व मोबाईल क्रमांक जिल्हाधिकारी कार्यालयास तात्काळ सादर करावेत. पाहणीचे छायाचित्रे व अहवाल शेअर करण्यासाठी विशेष व्हॉट्स ?प ग्रुप तयार करण्यात यावा, असेही निर्देश देण्यात आले.जल जीवन मिशनअंतर्गत जिल्ह्यातील अपूर्ण कामे प्रथम प्राधान्याने पूर्ण करण्यासाठी उपअभियंत्यांनी प्रत्यक्ष पाठपुरावा करावा. सर्व संबंधित विभागांनी बैठकीत दिलेल्या सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करून तात्काळ अनुपालन अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करावा,असे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले.

# वेदमूर्ती श्रीकृष्णा शास्त्री पळसकर यांचा श्रृंगऋषी संस्थान तर्फे सत्कार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

महाराष्ट्र शासनाचा प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार' प्राप्त झालेले, तसेच अयोध्येतील ऐतिहासिक श्रीराम मंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात पौरोहित्याचा बहुमान लाभलेले सामवेदाचार्य, वेदमूर्ती श्रीकृष्णा शास्त्री पळसकर यांनी बुधवारी अनसिंग येथील पौराणिक व ऐतिहासिक श्री श्रृंगऋषी महाराज मंदिरात दर्शनासाठी भेट दिली.

या प्रसंगाचे औचित्य साधून श्री श्रृंगऋषी महाराज मंदिर संस्थान आणि अनसिंग येथील ब्राह्मण समाजाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह आणि पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण गौरव करण्यात आला.वेदमूर्ती श्रीकृष्णा शास्त्री पळसकर यांनी सामवेदाचा आणि सनातन वैदिक संस्कृतीचा वसा अत्यंत निष्ठेने आणि तपश्चर्येने जपला आहे. वेदशास्त्रोक्त अध्ययन, अध्यापन आणि संवर्धनातील त्यांचे योगदान अतुलनीय असून, संपूर्ण देशभरात ते आपल्या साधनेसाठी आणि सात्विक आचरणासाठी ओळखले जातात.

**रामायणकालीन परंपरेचा विलक्षण योगायोग**

येथे एक विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, रामायण काळात राजा दशरथाला पुत्रप्राप्तीसाठी जो पुत्रकामेष्टी यज्ञ करावा लागला होता, तो यज्ञ याच पवित्र भूमीतील श्री श्रृंगऋषी महाराजांनी केला होता. आणि आज याच पावन मातीत जन्माला आलेले वेदमूर्ती श्रीकृष्णा शास्त्री पळसकर यांनी अयोध्येतील भव्य श्रीराम मंदिरात प्रभू श्रीरामललाच्या प्राणप्रतिष्ठेचे पौरोहित्य करणे, हा एक विलक्षण आणि दैवी योगायोग आहे, असे म्हणणे वावगे



ठरणार नाही. अयोध्येतील त्या अलौकिक सोहळ्याचे पौरोहित्य करण्याचा पवित्र मान देशातील मोजक्या वेदपंडितांना मिळाला, त्यात पळसकर शास्त्री यांचा समावेश होता. हा केवळ त्यांच्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रासाठी, वाशीम जिल्ह्यासाठी आणि विशेषतः अनसिंग वासियांसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. त्यांच्या संस्कृत क्षेत्रातील या अतुलनीय योगदानाची दखल घेऊन नुकताच महाराष्ट्र शासनाने त्यांना मानाच्या 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कारा'ने सन्मानित केले आहे. याप्रसंगी बोलताना येथील माजी सरपंच जगदीश राजे म्हणाले की, 'वेदमूर्ती श्रीकृष्णा शास्त्री पळसकर यांच्यासारखे ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व आपल्या मातीत असणे आणि त्यांनी अयोध्या येथील श्रीराम मंदिरात पौरोहित्य करणे, हे आपल्या अनसिंगसाठी अत्यंत भाग्याचे आहे. त्यांचा हा सत्कार म्हणजे एका अर्थाने वेदांचा आणि आपल्या सनातन परंपरेचाच गौरव आहे.' या सत्कार सोहळ्याप्रसंगी कौंडिण्य गुरु, राजू इंगळे, जगदीश राजे, राजू देशपांडे, मनोज देशपांडे, रविंद्र पळसकर यांच्यासह मंदिर संस्थानचे पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# वेल्डिंग करताना ट्रॅक्टरचा भीषण स्फोट; तिघांचा मृत्यू

## उमरखेड हादरले : सात जण गंभीर जखमी, नांदेडला उपचारासाठी हलविले






प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**उमरखेड** : दगडांवर छिद्रे पाडण्याच्या कामासाठी वापरण्यात येणाऱ्या ट्रॅक्टरची वेल्डिंग सुरू असताना झालेल्या भीषण स्फोटात तिघांचा मृत्यू झाला, तर सात जण गंभीर जखमी झाले. ही थरारक घटना शनिवारी (दि. २६) सकाळी साडेअकराच्या सुमारास उमरखेड-ढाणकी मार्गावरील बैलबाजारासमोरील किसान वेल्डिंग वर्कशॉपमध्ये घडली. स्फोटाचा आवाज सुमारे दोन किलोमीटरपर्यंत ऐकू गेल्याने शहरात एकच खळबळ उडाली.

या दुर्घटनेत अविनाश बेले (३०, रा. बाळदी, ता. उमरखेड) आणि सय्यद शाजेब सय्यद अनिस (१४, रा. उमरखेड) यांचा घटनास्थळीच होरपळून मृत्यू झाला. तर गंभीर जखमी शेख जावेद शेख बाबू (१९, रा. उमरखेड) याला नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला.

सै. उमेर सै. अनिस (१७), बाशिदखान राशिदखान (३२), सैय्यद जोहान सैय्यद मोबीन (१४), सलमान खान शेरु खान (३४), वैभव बोक्से (१७) आणि आप्पाराव बोक्से (४५) यांच्यासह अन्य एक जखमी अशा सात जणांवर उपचार सुरू आहेत. त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे.

दगडांवर छिद्रे पाडण्याच्या कामासाठी वापरण्यात येणारा ट्रॅक्टर वेल्डिंगसाठी किसान वेल्डिंग वर्कशॉपमध्ये आणण्यात आला होता. वेल्डिंगचे काम सुरू करताच अचानक मोठा स्फोट झाला. स्फोटाची तीव्रता एवढी होती की, परिसरातील नागरिक हादरले. काही जखमी हवेत उडून इतर वाहनांवर जाऊन आदळल्याची माहिती आहे. ट्रॅक्टरमध्ये नेमका कोणता पदार्थ होता. त्याच्या संपर्कात आल्याने स्फोट झाला का, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही. जिलेटीन अथवा अन्य स्फोटक पदार्थ असल्याचा संशय व्यक्त केला जात असला, तरी याला अधिकृत दुजोरा मिळालेला नाही.

घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी गौरव कार्यंदे, पोलिस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. पोलिसांनी परिसरात बंदोबस्त तैनात केला. फॉरेन्सिक पथकाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला असून, स्फोट नेमका कशामुळे झाला, हे तपासानंतर स्पष्ट होणार आहे. दरम्यान, जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनीही घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.

आमदार किसनराव वानखेडे, जिल्हा भाजप समन्वयक नितीन भुतडा यांनी घटनास्थळासह उपजिल्हा रुग्णालयात जाऊन जखमींची माहिती घेतली. घटनेनंतर घटनास्थळ आणि रुग्णालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर

## 'ट्रिगर-१' लागू; पीक नुकसानीच्या पंचनाम्यांना सुरुवात करण्याचे निर्देश

प्रतिनिधी २७ सप्टेंबर



**यवतमाळ** : पावसातील तूट आणि खरीप हंगामातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता राज्य शासनाने यवतमाळ जिल्ह्यातील सर्व १६ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर केला आहे. राज्यातील २६५ तालुक्यांचा दुष्काळग्रस्त तालुक्यांमध्ये समावेश करण्यात आला आहे. यवतमाळातील बाभूळगाव, यवतमाळ, कळंब, दारव्हा, दिग्रस, आर्णी, नेर, पुसद, उमरखेड, महागाव, वणी, मारेगाव, झरी-जामणी, केळापूर, घाटंजी, राळेगाव या तालुक्यांचा त्यात समावेश आहे.

राज्य शासनाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केल्यानंतर दुष्काळी परिस्थितीचे तत्काळ सर्वेक्षण व पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. खरीप २०२६ च्या पीक परिस्थितीचा आढावा घेऊन कृषी आयुक्तांनी दिलेल्या अहवालाच्या आधारे या तालुक्यांमध्ये दुष्काळाचा 'ट्रिगर-१' लागू करण्यात आला आहे.

पंचनाम्यादरम्यान सर्वेक्षण केलेल्या क्षेत्रातील पिकांची स्थिती दर्शविणारी छायाचित्रे आणि जीपीएस नोंदी घेऊन पीक परिस्थितीचा अहवाल तयार केला जाणार आहे. महसूल, कृषी आणि संबंधित विभागांनी समन्वयाने ही कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दुष्काळग्रस्त भागासाठी जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी संबंधित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, कृषी पंपांच्या वीजबिलात सूट, विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आदी सवलती लागू करण्यात येणार आहेत. रोजगार हमीच्या कामांच्या निकषात शिथिलता आणून अधिकाधिक कामे सुरू करण्याचेही निर्देश आहेत. याशिवाय आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था, अन्नधान्याचा पुरवठा आणि जलसंधारणाची कामे हाती घेण्यात येणार आहेत. टंचाई जाहीर केलेल्या गावांतील शेतीपंपांची वीज खंडित केली जाणार नाही. पीक नुकसानीची मदत मात्र विहित कार्यपद्धतीनुसार पंचनामे व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर स्वतंत्र शासन निर्णयाद्वारे जाहीर केली जाणार आहे. दरम्यान, दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले आहेत. आता प्रत्यक्ष पंचनामे आणि मदतीच्या प्रक्रियेकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# केळापूरच्या जगदंबा नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी

## अखंड मनोकामना ज्योतीत सहभागी होण्याचे संस्थानचे आवाहन

प्रतिनिधी २७ सप्टेंबर



**पांढरकवडा** : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या केळापूर येथील श्री जगदंबा मातेचा शारदीय नवरात्रोत्सव दि. ११ ते २० ऑक्टोबर दरम्यान उत्साहात साजरा होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्री जगदंबा संस्थानच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांची तयारी सुरू करण्यात आली आहे.

नवरात्रोत्सवातील नऊ दिवस पहाटे व सायंकाळी होणाऱ्या श्री जगदंबा मातेच्या आरतीचा मान यंदाही सोडतीद्वारे देण्यात येणार आहे. सोडतीत निवड झालेल्या भाग्यवान भाविकांना प्रत्यक्ष मातेची आरती करण्याचा मान मिळणार आहे.

यासोबतच नवरात्रोत्सवाच्या संपूर्ण कालावधीत संस्थानच्या मुख्य सभागृहात अखंड मनोकामना ज्योत प्रज्वलित करण्यात येणार आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही नवरात्रोत्सवानिमित्त केळापूर येथे भव्य जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. धार्मिक कार्यक्रमांसह जत्रेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाभरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे. हे आवाहन संस्थानचे अध्यक्ष शंकर बडे, उपाध्यक्ष काशिनाथ शिंदे, सचिव चंद्रशेखर पोलाडीवार, कोषाध्यक्ष प्रेमराव वखरे, सहसचिव वामनराव सिडाम, विश्वस्त दीपक कापर्तीवार व अण्णासाहेब पारवेकर यांनी केले आहे.

# 29 सप्टेंबर ते 31 ऑक्टोबरपर्यंत लोकशाही दिन बंद

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**यवतमाळ** : महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे २९ सप्टेंबर ते ३१ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येणार नाही.

निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लोकशाही दिन बंद राहणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अनिरुद्ध बक्षी यांनी दिली. निवडणूक कालावधीत आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. नागरिकांनी तसेच संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे प्रशासनाने कळविले आहे. निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर लोकशाही दिनाचे आयोजन पूर्ववत करण्यात येणार आहे.

# महसुली वाद मिटविण्यासाठी ५ ऑक्टोबरला लोकअदालत

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**यवतमाळ** : जमिनीशी संबंधित प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणे तडजोडीने व जलदगतीने निकाली काढण्यासाठी महसूल प्रशासनातर्फे लोक अदालत अभियान राबविण्यात येत आहे. महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षानिमित्त शासनाने हे विशेष अभियान हाती घेतले आहे. अभियानांतर्गत मंडळ, तहसील व उपविभागीय स्तरावर ५ ऑक्टोबर रोजी लोक अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे. महसूल अधिकाऱ्यांच्या न्यायालयांत जमिनीशी संबंधित अनेक दावे प्रलंबित आहेत. एका स्तरावरील निर्णयाविरोधात वरिष्ठ न्यायालयात अपील किंवा पुनरीक्षण दाखल होत असल्याने प्रकरणे लांबतात. पक्षकारांचा वेळ व आर्थिक खर्च वाचविण्यासोबतच महसूल यंत्रणेवरील ताण कमी करण्यासाठी दोन्ही पक्षकारांच्या सहमतीने तडजोडीने दावे निकाली काढण्यात येणार आहेत. वकील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या अशिलांना अभियानात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी विजय सूर्यवंशी व तहसीलदार राजेश पऊळ यांनी केले आहे.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत मानवी रांगोळी



■ यवतमाळ : सेवा संकल्प अभियानांतर्गत महागाव येथील निवासी शाळेच्या विद्यार्थ्यांनी मानवी रांगोळी साकारून जनजागृतीचा संदेश दिला. पारधी, कोलाम तसेच विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या नागरिकांपर्यंत शासनाच्या विविध योजना व आवश्यक सेवांचा लाभ पोहोचविण्यासाठी प्रशासनाकडून थेट बेडे, पाडे व वस्त्यांवर शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध २२ सेवांचा लाभ एकाच ठिकाणी मिळणार आहे. प्रशासन नागरिकांच्या दारी पोहोचत असल्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

# लाडक्या बहीणीसाठी 'जनता दरबार'

## काँग्रेस पक्षाचा उपक्रम; त्रुटी दूर करण्यावर भर

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**महागाव** : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचे नियमित मिळणारे अनुदान अचानक बंद झाल्याने अडचणीत आलेल्या महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी महागाव येथे एका विशेष 'जनता दरबारा'चे आयोजन करण्यात आले आहे. महागाव तालुका काँग्रेस कमिटी, तालुका महिला काँग्रेस आणि शहर काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विद्यमाने येत्या बुधवारी (३० सप्टेंबर) सकाळी ११ वाजता शेबे कॉम्प्लेक्स, महागाव येथे हा दरबार पार पडणार आहे.

महागांव तालुक्यातील ज्या लाभार्थी महिलांना योजनेचा हप्ता आधी मिळत होता, परंतु सध्या काही तांत्रिक किंवा प्रशासकीय कारणांमुळे तो बंद झाला आहे, अशा सर्व महिलांच्या तक्रारी या जनता दरबारात नोंदवून घेतल्या जाणार आहेत.

या जनता दरबारात महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असून, महिलांच्या अर्जांमधील त्रुटी व तांत्रिक अडचणींचे निवारण करून योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे, अशी माहिती महिला काँग्रेसच्या तालुकाध्यक्षा जयश्री संजय नरवाडे यांनी दिली.

# गणपती विसर्जन : पैनगंगेत बुडून तरुणाचा मृत्यू

## चार-पाच तरुण पाण्यात पडले; इतरांना वाचविण्यात यश

प्रतिनिधी २७ सप्टेंबर



**उमरखेड** : तालुक्यातील बारा येथे गणपती विसर्जनासाठी पैनगंगा नदीपात्रात गेलेल्या १७ वर्षीय तरुणाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना दि. २५ सप्टेंबर रोजी दुपारी चारच्या सुमारास घडली.

हरीश पुंडलिक हरणे (वय १७, रा. बारा) असे मृतक तरुणाचे नाव आहे.

अनंत चतुर्दशीच्या पार्श्वभूमीवर बारा येथील काही तरुण घरगुती गणपतीच्या विसर्जनासाठी पैनगंगा नदीपात्रात गेले होते. विसर्जन करीत असताना चार ते पाच तरुणांचा पाय घसरल्याने ते अचानक पाण्यात पडले. त्यांच्यासोबत असलेल्या नागरिकांनी तत्परता दाखवत त्यापैकी चार-पाच जणांना पाण्याबाहेर काढण्यात यश मिळविले. मात्र, हरीश हरणे हा पाण्याच्या प्रवाहात बुडाला. घटनेची माहिती मिळताच शोधमोहीम राबविण्यात आली. एनडीआरएफच्या पथकाने प्रयत्न करून हरीशचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढला. गणपती विसर्जनाच्या उत्साहात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे बारा गावावर शोककळा पसरली असून, हरीशच्या मृत्यूने कुटुंबीयांसह ग्रामस्थांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# कोरडा दुष्काळ घोषित करून हेक्टरी १ लाखाची मदत द्या

## शेतकरी संघर्ष समितीची मागणी

प्रतिनिधी २७ सप्टेंबर

**यवतमाळ** : यवतमाळ जिल्ह्यातील शेंबाळपिंपरी महसूल मंडळात यंदा जुलै व ऑगस्ट महिन्यांपासून पावसाने ओढ दिल्याने निर्माण झालेल्या भीषण दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने जिल्ह्यात तातडीने कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची आर्थिक मदत द्यावी, अशी जोरदार मागणी 'शेतकरी संघर्ष समिती'च्या वतीने करण्यात आली आहे.

शासनाने थकीत कर्जदार शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केल्यानंतर शेंबाळपिंपरी महसूल मंडळातील विविध कार्यकारी सहकारी संस्था आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (डीसीसीबी) शाखेने थकीत कर्जदारांच्या अधिकृत याद्या प्रसिद्ध केल्या आहेत. यामुळे अनेक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, दुसरीकडे 'भारतीय स्टेट बँक' (एसबीआय) शाखा शेंबाळपिंपरीच्या वतीने अद्याप थकीत कर्जदार शेतकऱ्यांची यादी अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित बँकेच्या शेतकरी ग्राहकांना योजनेची अचूक माहिती न मिळाल्याने नाहक मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. याबाबत जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडेही पाठपुरावा करण्यात येत आहे.

यंदा पाऊस न पडल्याने पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले असून, परिसरात पिण्याच्या पाण्याचीही गंभीर टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे प्रशासनाने पंचनाम्यांचा फारस न करता थेट कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि विमा कंपनीकडून १०० टक्के पिकविमा मंजूर करून रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बचत खात्यात जमा करावी, अशी मागणी यवतमाळ जिल्ह्यातील महसूल, पंचायत, कृषी व सहकार विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून करण्यात आली.



हे निवेदन देतेवेळी शेतकरी संघर्ष समितीचे कार्याध्यक्ष जैनुल सिद्दीकी यांच्यासह शेंबाळपिंपरी महसूल मंडळातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कत्तल : ६० जनावरांसह कंटेनर जप्त

## अवधूतवाडी पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी २७ सप्टेंबर



**यवतमाळ** : कत्तलीच्या उद्देशाने गोवंश जनावरांची ट्रकमधून वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अवधूतवाडी पोलिसांनी सापळा रचून ६० गोवंश जनावरांची सुटका केली. यवतमाळ बायपासवरील वनवासी मारुती परिसरातील उड्डाणपुलाजवळ ही कारवाई करण्यात आली.

ट्रकमधून गोवंश जनावरांची वाहतूक केली जात होती. पोलिसांनी सापळा रचून पीबी-१०-एफएफ-१२६३ क्रमांकाचा १४ चाकी कंटेनर अडविला. तपासणीदरम्यान त्यामध्ये ६० गोवंश जनावरे आढळून आली. प्रत्येक जनावराची अंदाजे किंमत २० हजार रुपये असून, एकूण किंमत सुमारे १२ लाख रुपये आहे. तसेच सुमारे १५ लाख रुपये किमतीचा कंटेनर असा एकूण २७ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला.

या प्रकरणी मोहब्बत अली (२४, रा. सारंगपूर, उत्तर प्रदेश), एकराम मोहम्मद अजगर (३४, रा. भोपाळ, असीम बोर्ड), वाजिद अली साबीर अली (३१, रा. सारंगपूर, उत्तर प्रदेश) आणि मोहम्मद असलम मोहम्मद अजगर (३५, रा. भोपाळ, असीम बोर्ड) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. जनावरे आणि वाहन ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांकडून पंचनामा व पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे. या कारवाईमुळे गोवंश वाहतुकीचा प्रकार उघडकीस आला असून, प्रकरणाचा पुढील तपास अवधूतवाडी पोलिस करीत आहेत.

# आर्णीतून हिमाचलकडे सायकल ज्योत यात्रा रवाना

प्रतिनिधी २७ सप्टेंबर



**आर्णी** : संघर्ष बहुउद्देशीय नवरात्र ज्योत प्रसारक मंडळाच्या वतीने आई चिंतपूर्णी देवीची पवित्र ज्योत आर्णीत आणण्यासाठी सायकल ज्योत यात्रेला सुरुवात करण्यात आली. आर्णी येथील भक्तगण सायकलवरून हिमाचल प्रदेशाकडे रवाना झाले.

श्रद्धा आणि भक्तिभावाने सुरू झालेल्या या यात्रेत मंडळाचे भक्त सहभागी झाले आहेत. सायकलवरून हिमाचल प्रदेश गाठल्यानंतर तेथून आई चिंतपूर्णी देवीची पवित्र ज्योत घेऊन भक्त आर्णीत परतणार आहेत. या ज्योतीच्या माध्यमातून नवरात्रोत्सवात धार्मिक वातावरण निर्माण करण्याचा मंडळाचा प्रयत्न आहे.

सायकल ज्योत यात्रेच्या निमित्ताने भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, यात्रेकरूंच्या या अनोख्या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

